www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



अगोदर 'विजय ते विजया'साठी लढली, आता राज्याची पहिली 'ट्रांसजेंडर वनरक्षक'!

पान ४ वर....

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



महायुतीला मतदान न करण्याची केली प्रतिज्ञा!

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १५९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार,६ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## ठाण्यात निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी पोलिस तैनात !



● ठाणे, यश सावंत :

विधानसभा निवडणूका जाहीर झाल्या असल्या तरी दिवाळी निमित्ताने आणि पक्षातील बंडखोरींमुळे प्रचाराच्या तोफा थंडावल्या होत्या. आता बहुतांश बंडखोरांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने उमेदवारांनी प्रचाराला सुरूवात केली आहे. या कालावधीत कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात शहर पोलिसांच्या बंदोबस्तासह केंद्रीय पोलीस दलाच्या सात तुकड्या, तपासणी नाके, भरारी पथके तैनात करण्यात आली आहे. तसेच संवेदनशील मतदारसंघात रुट मार्च देखील काढला जात आहे. रात्रीच्या वेळात पोलिसाच्या पथकांकडू गस्ती घातली जात आहे. अमली पदार्थांच्या तस्करीवरही पोलिसांचे लक्ष आहे.

निवडणूका शांततेत आणि निष्पक्ष पार पाडल्या जाव्यात यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असतात. ठाणे जिल्ह्यात एकूण १८ विधासभा मतदारसंघ आहेत. यातील बहुतांश मतदारसंघ ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्राच्या हद्दीत आहेत. निवडणूकांच्या कालावधीत आयुक्तायल क्षेत्रात आचारसंहितेचा भंग होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून ठाणे पोलिसांचा ठिकठिकाणी बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात ४० हून अधिक ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. याठिकाणी संशयित वाहनांची तपासणी केली जात आहे. तसेच अनेक ठिकाणी भरारी पथके देखील तैनात आहेत. पान २ वर

## २५ नोव्हेंबरपासून असणार संसदेचे हिवाळी अधिवेशन



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी ट्विट करत ही माहिती दिली आहे. संसदेचे हे अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. लोकसभा निवडणूकीनंतर एनडीएचे सरकार जरी आले असले तरी इंडिया आघाडी सह इतर विरोधकांचा आकडा दोनशेच्या पार गेला आहे. त्यामुळे देशात सरकार स्थापन केल्यानंतर पार पडलेल्या पहिल्याच पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना घाम फोडला होता. त्यामुळे आता हिवाळी अधिवेशनात देखील असेच चित्र पाहायला मिळणार आहे.

## सूरतमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचं मंदिर बांधणार; कोल्हापूरमध्ये उद्धव ठाकरेंची घोषणा

● कोल्हापूर, सचिन कदम :



मंगळवारी उद्धव ठाकरे यांनी आई अंबाबाईचे दर्शन घेऊन, बाळूमामा यांचं दर्शन घेऊन आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी कोल्हापूरमध्ये मोठी घोषणा केली तसेच विरोधकांवर जोरदार हल्लबोल केला. आमचे सरकार आले तर आम्ही राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे केवळ पुतळे उभा करणार नाही तर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिरं उभारणार. तसेच महाराष्ट्रातच नाहीतर सुरतमध्येही छत्रपती शिवाजी महाराजांचं मंदिर उभारणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

इंग्रजांना विरोध करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली होती. त्याच सुरतेमध्ये महाराष्ट्राच्या पाठीत वार करुन तुम्ही गद्दार घेऊन गेला होता. त्याच सुरतमध्ये शिवाजी महाराजांचं मंदिर बांधणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. ५० खोके घेऊन तुम्ही महाराष्ट्र विकत घेऊ शकत नाही. पान २ वर

## डोंबिवलीतील १९ बेशिस्त वाहनचालकांवर फौजदारी कारवाई

● डोंबिवली, आकाश कांबळे :



पूर्वेकडील पी अँन्डी टी कॉलनीमध्ये असलेल्या हनुमान मंदिरासमोर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची सोमवारी (दि.४) संध्याकाळी जाहीर सभा पार पडली. या सभेच्या निमित्ताने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी कोळसेवाडी वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी मानपाडा रोडला वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी नियोजन केले होते. या नियोजनाच्यावेळी काही रिक्षा आणि कार चालकांनी सांगावच्या साईबाबा मंदिर ते मानपाडा चौकादरम्यान विरूद्ध दिशेने वाहने चालवून मानपाडा रस्त्यावर अर्धा तास वाहतूक कोंडी केली. अशा पद्धतीने वाहने चालविणाऱ्या १९ वाहनचालकांच्या विरोधात कोळसेवाडी वाहतूक नियंत्रण शाखेतील हवालदाराच्या तक्रारीवरून मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना सभास्थानी योग्यवेळेत वाहतूक कोंडीमुक्त रस्त्यावरून जाता यावे यासाठी कोळसेवाडी वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी नियोजन केले होते. काही बेशिस्त चालकांनी मानपाडा रोडला असलेल्या सांगावच्या साईबाबा मंदिर ते मानपाडा चौकाकडे जाणाऱ्या मार्गिकेवर विरुद्ध दिशेने वाहने आणून अभूतपूर्व वाहतूक कोंडी केली होती. याच मार्गावरून राज ठाकरे सभास्थानी जाणार होते. बेशिस्त वाहन चालकांमुळे मानपाडा रोडने कल्याण-शिळ महामार्गाकडे जाणारी वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती.

पान २ वर

## राज्याच्या नव्या पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा यांची वर्णी

● मुंबई, राकेश गायकवाड :



राज्याच्या पोलीस महासंचालकपदी IPS अधिकारी संजय वर्मा यांची वर्णी लागली आहे. आयपीएस संजय वर्मा हे १९९० बॅचचे अधिकारी असून एप्रिल २०२८ पर्यंत ते पोलीस महासंचालक पदावर कार्यरत असणार आहेत. सध्या ते डीजी लीगल आणि टेक्निकल या पदावर कार्यरत आहेत. राज्यात विधानसभा निवडणुका असल्यामुळे संजय वर्मा तात्काळ पदभर स्वीकारतील, अशी माहिती समोर आली आहे. महाराष्ट्राची पहिली महिला पोलिस महासंचालक होण्याचा मान मिळालेल्या रश्मी शुक्ला यांना निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पदावरून हटवण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील अधिकारी म्हणून त्या कार्यरत होत्या. त्यांना हटवल्यानंतर विवेक फणसाळकर यांच्याकडे पोलीस महासंचालकाचा अतिरिक्त कारभार सोपवण्यात आला होता. पान २ वर

## दिवाळीच्या सलग सुट्यांमुळे महाबळेश्वर गुलाबी थंडीत पर्यटकांनी बहरले !



● सातारा, विशाल कारंडे :

दिवाळीतील सलग सुट्ट्यांमुळे महाबळेश्वर पर्यटकांनी बहरले आहे. वेण्णालेक नौकाविहारसह प्रेक्षणीय स्थळावर हिरवागार निसर्ग, सूर्यास्त व सूर्योदयाचे विहंगम दृश्य अनुभवण्यासाठी पर्यटकांची चांगलीच गर्दी होताना दिसत आहे. महाबळेश्वरची गुलाबी थंडी, मनमोहित करणारे निसर्गसौंदर्य अन् स्ट्रॉबेरीची चव चाखताना पर्यटक पाहावयास मिळत आहेत. महाबळेश्वरमध्ये दिवाळी हंगाम सुरू असल्याने पर्यटकांच्या स्वागतासाठी हॉटेलसह दुकानदार सज्ज झाले आहेत. देश-विदेशातील पर्यटकांची रेलचेल या निसर्गरम्य पर्यटनस्थळी वाढली आहे. दिवाळी व उन्हाळी हंगामात पर्यटकांची संख्या लक्षणीय असते. दिवाळीची सुटी सुरू झाल्याने या थंड हवेच्या पर्यटनस्थळी पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. पर्यटक हिरवाईने नटलेला निसर्ग अनुभवत असतानाच पर्यटक गुलाबी थंडीची मजा लुटत आहेत. केट्स पॉइंट, ऑर्थरसीट पॉइंट, श्रीक्षेत्र महाबळेश्वर मंदिर, ऐतिहासिक किल्ले प्रतापगड, लॉडवीक पॉइंट सूर्योदयासाठीचा प्रसिद्ध विल्सन पॉइंट, सूर्यास्तासाठीचा प्रसिद्ध मुंबई पॉइंटसह पर्यटकांच्या आकर्षणाचे ठिकाण लिंगमळा धबधबा ही पर्यटकांच्या पसंतीची ठिकाणे असलेली ही पर्यटनस्थळे गर्दीने गजबजून गेली आहेत. पान २ वर

## नियम मोडणाऱ्यांना दणका !पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील आयटीएमएस सिस्टीमचे काम पूर्ण

● पुणे, अभिजित येरल्लू :



पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील आयटीएमएस सिस्टीमचे काम पूर्ण झाले असून, वाहतूक नियमांचे पालन न करणारे वाहनचालक दंडात्मक कारवाईला पात्र ठरणार आहेत. 'आयटीएमएस'मुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघाताची सुरक्षा विचारात घेऊन अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्ते विकास महामंडळाने संपूर्ण ९४ किलोमीटर अंतराच्या रस्त्यावर आयटीएमएस प्रणाली बसवण्याचे काम गेल्या सहा महिन्यांपूर्वी हाती घेतले होते. ते सध्या पूर्ण झाले असून ही पद्धत नुकतीच सुरू केली आहे.

आयटीएमएस म्हणजे इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम. या पद्धतीमध्ये सॅटेलाईटद्वारे संपूर्ण माहिती नियंत्रण कक्षाला तत्काळ कळते. यासाठी ९४ किलोमीटर अंतरावराच्या रस्त्यावर संभाव्य अपघातग्रस्त १०६ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. हे सर्व कॅमेरे आयटीएमएस पद्धतीने सॅटेलाईटद्वारे कुसगाव येथील नियंत्रण कक्षाला जोडले आहेत.

या पद्धतीमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांच्या सर्व हालचालींची माहिती कॅमेऱ्यात कैद होते. त्यामुळे वाहतूक नियमांचे पालन न करणारे, अतिवेगाने वाहन चालवणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे, लेन कटिंग आदींसह अपघात झाला किंवा कोणतीही घटना घडली तर याची माहिती नियंत्रण कक्षाला तत्काळ कळते. त्यामुळे काही मिनिटांत अपघातग्रस्तांना मदत पुरवणे शक्य झाले आहे. या प्रणालीमुळे वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांना दंडाचा भुर्दंड बसत असून, वाहन प्रकारानुसार किमान पाचशे ते दोन हजार रुपये दंड हा भरावा लागत आहे.

अनेकवेळा बोरघाटात वेग मर्यादेचा विसर पडलेले वाहनचालक रस्ता मोकळा असल्यास वाहतूक नियमांचे उल्लंघन करून सुसाट जातात, याची नोंद नियंत्रण कक्षाला होत असते.

## मतदारांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करा- जिल्हाधिकारी अधिकारी अशोक शिनगारे

● ठाणे, भावना जैन : :

**विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर मतदारांसाठी करण्यात आलेल्या सोयीसुविधांचा आढावा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी घेतला. मतदान केंद्रावर मतदारांना कोणत्याही प्रकारच्या गैरसोईचा सामना करावा लागणार नाही व मतदान शांततेत पार पडेल, यासाठी प्रत्येकाने जबावदारीने व गांभीर्य लक्षात घेवून काम करण्याचे निर्देश सर्वांना दिले.**



ठाणे महानगरपालिका हद्दीत १ हजार ५४६मतदान केंद्रे , कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीत १ हजार २६१ मतदान केंद्रे, ग्रामीण भागात १ हजार १२४ मतदान केंद्रे, नवी मुंबई महापालिका हद्दीत ८३१ मतदान केंद्रे, मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ७५५ मतदान केंद्रे, भिवंडी महानगरपालिका हद्दीत ५८६ मतदान केंद्रे, उल्हासनगर महानगरपालिका ३९९मतदान केंद्रे, तर सर्व नगरपालिका हद्दीत ४५३ मतदान केंद्रे आहेत.

या सर्व मतदान केंद्रावर पुरविण्यात येणाऱ्या सोईसुविधांची जबाबदारी ही त्या त्या महानगरपालिका, नगरपालिका यांची असून ग्रामीण भागातील मतदान केंद्राची जबाबदारी ही जिल्हा परिषदेकडे आहे. या सर्व मतदान केंद्राची पाहणी ही त्या त्या आस्थापनातील अभियंत्यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून करण्याचे निर्देशही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी यावेळी दिले.

तसेच त्या मतदान केंद्रावर काही अडचण निर्माण होत असतील तर त्याबाबतची माहिती तात्काळ कळवावी, त्यावर योग्य तो तोडगा काढण्यात येईल, असेही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले.या बैठकीस उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, महापालिकांचे नगर अभियंता, तसेच ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर सोईसुविधांसाठी कार्यरत असलेले अभियंते उपस्थित होते. पान २ वर



## विक्रमगडमधील आदिवासी वारली चित्रकारांचा राष्ट्रपतींकडून सन्मान !

● पालघर, धनश्री सट्टा :

विक्रमगड येथील चित्रकार कृष्णा भुसारे व डहाणू गंजाड मधून प्रवीण म्हसे यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या आदिवासी चित्रकारांनी काढलेली चित्रे आता कायम स्वरूपी राष्ट्रपती भवनाच्या म्युझियम मध्ये राहणार असल्याचे सांगण्यात आले. पालघरमधील आदिवासी चित्रशैली ही साता समुद्राभर पोहचली असून अनेक आदिवासी नवोदित चित्रकार आपली कला वेगळ्या देशात तसेच भारतभर पोहचवत आहेत. पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# जनगणनेला मुहूर्त मिळणार ?

करोना साथरोगामुळे २०२१ मध्ये होऊ न शकलेली जनगणना कधी होणार या संदर्भात संसदेत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर मोदी सरकारने उत्तर दिलेले नाही. तरीही पुढील वर्षी म्हणजे २०२५ मध्ये देशात जनगणना केली जाईल, असे संकेत मिळत आहेत. जनगणना आयुक्त मृत्युंजयकुमार नारायण यांची मुदत येत्या डिसेंबरमध्ये संपणार होती, पण त्यांना ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ती जनगणनेसाठीच असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. ब्रिटिशांनी १८७२ पासून दर दहा वर्षांनी देशात जनगणना सुरू केली. त्यांच्यानंतरही ती सुरूच राहिली. शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. २०२१ मध्ये करोना साथीमुळे १६ वी जनगणना झाली नाही. करोनाच्या साथीतून सारे जग सावरले लोकसभा निवडणुकीनंतर जनगणनेची प्रक्रिया सुरू केली जाण्याची शक्यता वर्तविली जात होती. पण केंद्र सरकारने अद्यापही भूमिका स्पष्ट केलेली नाही. मार्च २०२० नंतर जगातील १४३ राष्ट्रांमध्ये जनगणनेची प्रक्रिया पार पाडण्यात आली. भारतात मात्र जनगणना झालेली नाही. कदाचित २०२५ मध्ये जनगणना करून यापुढील काळात दर दहा वर्षांनी म्हणजे २०३५, २०४५ अशी साखळी बदलण्याचा केंद्राचविचार असू शकतो.जनगणना २०२५ मध्ये पार पाडण्याची अधिक शक्यता वर्तविली जाते. कारण २०२९ पासून संसद आणि विधिमंडळांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्याची मोदी सरकारची योजना आहे. यासाठी गेल्या वर्षी १०६ व्या घटना दुरुस्तीच्या आधारे महिला आरक्षण लागू करण्यात आले. त्याआधी जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करावी लागणार आहे. केंद्र सरकारचे हे सारे नियोजन लक्षात घेता जनगणनेला मुहूर्त लाभेल अशी चिन्हे आहेत. लोकसभेच्या मतदारसंघांमध्ये २०२६ नंतर बदल करण्याची घटना दुरुस्ती वाजपेयी सरकारच्या काळात करण्यात आली होती. सध्याच्या लोकसभेच्या मतदारसंघांची संख्या ही १९७१ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे निश्चित करण्यात आली होती.

तेव्हा देशाची लोकसंख्या ५५ कोटीच्या आसपास होती. आता लोकसंख्या १४० कोटींवर गेली आहे. २००१ मध्ये लोकसभेच्या मतदारसंघांची रचना बदलण्याची मुदत होती. पण नवीन वादाला निमंत्रण नको म्हणून तत्कालीन वाजपेयी सरकारने २५ वर्षांनंतर ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी घटनेत दुरुस्ती केली होती. ही मुदत २०२६ पर्यंत आहे. जनगणनेची आकडेवारी प्राप्त झाल्यावर मतदारसंघांची पुनर्चना करण्यात येणार आहे. जनगणनेत जातनिहाय जनगणना हा आणखी एक कळीचा मुद्दा आहे. केंद्रातील भाजप सरकारने जातनिहाय जनगणनेला कायम विरोध दर्शविला आहे. सर्वोच्च न्यायालयात केंद्राने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातही जातनिहाय जनगणनेच्या विरोधी सूर होता. बिहारमध्ये नितीशकुमार सरकारने जातीनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला तेव्हा भाजपनेच विरोधी भूमिका मांडली होती. भाजप वगळता बहुतेक राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवरील राजकीय पक्षांची जातनिहाय जनगणनेची मागणी केली आहे. १९३१ नंतर देशात जातनिहाय जनगणना झालेली नाही. २०११ मध्ये काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडी सरकाने जनगणनेतच सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षण केले होते. पण त्याचे निष्कर्ष मोदी सरकारने जाहीर करण्याचे टाळले. या सर्वेक्षणात त्रुटी असून, आकडेवारीत घोळ असल्याचा दावा सरकारने केला होता. जातनिहाय जनगणना झाल्यास ओबीसी समाजाची नेहमीची तक्रार दूर होण्यास मदतच होईल. कारण देशात ओबीसी समाज नक्की किती यावर नेहमीच वाद असतो. काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षांचा जातनिहाय जनगणनेला पाठिंबा आहेच पण सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्ष असलेले नितीशकुमार यांचा संयुक्त जनता दल, जनशक्ती पार्टी, अपना दल यांनीही जातनिहाय जनगणनेची मागणी केली आहे. अगदी रा. स्व. संघानेही जातनिहाय जनगणनेचे समर्थन केले आहे. जनगणनेत जातनिहाय जनगणनेचा मुद्दा टाळल्यास केंद्र सरकारच्या विरोधात रोष निर्माण होऊ शकतो. यामुळेच सरकारला यावरही सावध पावले टाकावी लागणार आहे. पुढील जनगणना ही डिजीटल पद्धतीने करण्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मागे केली होती. प्रचलित पद्धतीत बदल करून डिजिटल पद्धतीने अधिक सुटसुटीत केल्यास वेळेची बचत होऊ शकेल. जनगणना लवकरात लवकर व्हावी हीच अपेक्षा. लोकसभा निवडणुकीत संजय पाटील यांच्याकडून पराभूत झाल्याने ते विधानसभेची जागा राखतात की तीस वर्षांनी हा मतदारसंघ भाजपच्या हातून निसटतो याचे उत्तर मतदारांकडून मिळेल.


## आजची चित्रोळी



बहरूनी लगडतां झाड फळांनी साजे
लपविती फळांना पान मनोमन लाजे
असे ऐश्वर्य पाहुनी मोह मनाला पडला
चाखून पाहाण्या जीव मम आतुरला

**मुकुंद कुलकर्णी, मुंबई**

# पुन्हा नव्या चलनाची चर्चा



रशियातील कशान येथे झालेल्या सोळाव्या ब्रिक्स परिषदेत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग अनेक अर्थाने महत्त्वाचा होता. ब्रिक्स शिखर परिषद ही जागतिक व्यवस्था बनवण्याच्या दिशेने सर्वात मोठा प्रयत्न आहे. ब्रिक्स राष्ट्रे अशा पर्यायी व्यवस्थेच्या संकल्पनेसह पुढे जात आहेत, ज्यामध्ये उदयोन्मुख अर्थव्यवस्था आणि उदयोन्मुख शक्तींना योग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल. आतापर्यंत जागतिक व्यवस्थेतील पाश्चात्य देशांच्या प्रभावामुळे हे शक्य नव्हते पा दृष्टिकोनातून 'ब्रिक्स' ची प्रक्रिया सातत्याने पुढे जात आहे. यात नवी राष्ट्रेही जोडली जात आहेत. ब्रिक्स परिषदेत मोदी यांनी मांडलेले विचार खूप महत्त्वाचे आहेत. ब्रिक्स परिषदेदरम्यान दिलेल्या भाषणात मोदी यांनी स्पष्टपणे सांगितले की ब्रिक्स ही निर्णायक संघटना नाही, तर तो एक संघटना आहे, जी जगात समन्वयासाठी काम करेल. 'ब्रिक्स'कडे पाश्चात्यविरोधी संघटना म्हणून पाहिले जाऊ नये. 'ब्रिक्स'कडे बहुधुवीय जग निर्माण करण्याचा सकारात्मक अजेंडा म्हणून पाहण्याची गरज आहे. जगात शांतता, सुरक्षा आणि स्थिरता वाढवण्यासाठीच ही संघटना काम करेल. हा फूट पाडण्याचा प्रयत्न नाही किंवा 'ब्रिक्स' ही फूट पाडणारी संघटना नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. मोदी यांनी 'ब्रिक्स'मध्ये दहशतवादावर आपले मत स्पष्टपणे व्यक्त केले. दहशतवादाणा दुटप्पीपणे सामोरे जाऊ शकत नाही. दहशतवादाचा पराभव होऊ शकत नाही. दहशतवादाच्या आव्हानांना तोंड द्यायचे असेल, तर एकता आणि दुढनिश्चयाची मजबूत रणनीती हवी, असे त्यांनी सांगितले. त्या वेळी त्या व्यासपीठावर इराणचे अध्यक्ष पेजस्कियान देखील उपस्थित होते.

या प्रसंगी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हेही उपस्थित होते. या दोन राष्ट्रांचा दहशतवादाबाबतचा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. मोदी यांनी दहशतवादाबाबत आपले मत स्पष्टपणे मांडले. साहजिकच दहशतवादाच्या संदर्भात एकता असली पाहिजे, असा संदेश या राष्ट्रांना आणि संपूर्ण जगाला गेला आहे. मोदी यांनी 'ब्रिक्स'च्या अर्थव्यवस्थेला शक्य तितके एकत्रित कसे करता येईल आणि स्थानिक चलनात देशाचा व्यापार कसा वाढवता येईल, यावर सुरू असलेल्या चर्चेला पाठिंबा दर्शवला आहे. ब्रिक्स परिषदेत महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवर चर्चा झालोच, पण या परिषदेच्या वेळी झालेल्या द्विपक्षीय बैठकाही अतिशय महत्त्वाच्या होत्या. त्या बैठकांमध्ये मोदी यांनी सर्वप्रथम रशियाचे अध्यक्ष वलादिमीर पुतीन यांची भेट घेतली. तेच या परिषदेचे यजमान होते. मोदी यांनी इराणचे अध्यक्ष पेजस्कियान यांचीही भेट घेतली. पश्चिम आशियाच्या संदर्भात भारताने मुत्सद्देगिरीवर भर दिल्याबद्दल आपल्या आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाची असणारी 'ब्रिक्स' राष्ट्रांची परिषद अलिकडेच पार पडली. त्यातील भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग महत्त्वाचा ठरला. ब्रिक्स शिखर परिषद ही जागतिक व्यवस्था बहुध्रुवीय बनवण्याच्या दिशेने सर्वात मोठा प्रयत्न आहे. यामध्ये उदयोन्मुख अर्थव्यवस्था आणि शक्तींना योग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल. या दृष्टिकोनातून 'ब्रिक्स'ची प्रक्रिया सातत्याने पुढे जात आहे. यात नवी राष्ट्रेही जोडली जात आहेत.

दृष्टिकोनाचा पुनरुच्चार केला. ब्रिक्स परिषदेच्या पाश्र्वभूमीवर झालेली सर्वात महत्त्वाची बैठक मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची होती. तब्बल पाच वर्षांनंतर मोदी आणि जिनपिंग यांची भेट झाली. 2019 पासून या दोन नेत्यांची औपचारिक भेट झाली नव्हती. चीनने एप्रिल 2020 मध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर अतिक्रमण केले. सैन्य घुसवले. त्यामुळे लडाखमधील सतत सुरु होती. साहजिकच पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील नवा भारत चीनशी चर्चेत कधीच मागेपुढे पहात नाही आणि चर्चेची प्रक्रिया सातत्याने सुरू ठेवतो, परंतु चीन सर्व विषयांवर चर्चेसाठी तयार असेल तरच संबंध सामान्य करणे शक्य आहे. भारताने चीनसमोर मांडलेली अट अतिशय स्पष्ट आणि दृढ होती. तथापि, चीनने गलवान व्हॅली, पेंगाँग त्सो, गोगरा आणि हॉट संप्रंग या भागात आपले सैन्य तैनात केले होते. डेमचौक आणि डेपसांग भागात चीनने पूर्वस्थिती कायम ठेवली नाही. भारताच्या बाजूने सांगण्यात आले की, चार भागांमध्ये पूर्वस्थिती कायम करण्यात आली आहे; परंतु डेपसांग आणि डेमचौकमधील प्रलंबित मुद्द्यांवर औपचारिक चर्चा झाल्याशिवाय स्थिती कायम ठेवली जाणार नाही, असे भारतीय बाजूने सांगितले.

ब्रिक्स परिषदेच्या एक दिवस आधी चीन आणि भारत यांच्यात करार झाला. दोन्ही राष्ट्रांनी डेपसांग आणि डेमचौकमध्ये गस्त घालण्यास खोऱ्यातील स्थिती बिघडली होती. भारत आणि चीनच्या सैन्यामध्ये गलवान हिंसाचाराची घटना घडली. चीनमधील संबंध अत्यंत खालच्या पातळीवर पोहोचले चीनने केलेल्या घुसखोरीनंतर भारत सतत म्हणत राहिला की चीन एप्रिल 2020 ची स्थिती पूर्ववत करत नाही, तोपर्यंत भारत आणि चीनमधील संबंध सामान्य होऊ शकत नाहीत. भारताने सातत्याने या निधारावर बांधिलकी कायम ठेवली. चीनने ज्या पद्धतीने भारत-चीन सीमेवर आपले सैन्य तैनात केले होते, त्याच पद्धतीने संरक्षण साहित्य तैनात ठेवले. असे असले तरी भारत चीनसोबतच्या चर्चेतून कधीच मागे हटला नाही. संवादाचे प्रयत्न सुरूच होते. भारताकडून कमांडर स्तरावरील चर्चेच्या 21 पेल्या झाल्या. परराष्ट्र मंत्री स्तरावरील चर्चा दर्शवली होती. आता या दोन्ही भागांमध्ये एप्रिल 2020 रोजीची पारिस्थिती कायम केली जाईल. 'ब्रिक्स'मध्ये समाविष्ट देशांनी स्थानिक चलनात व्यापार करण्यास सहमती दर्शवली आहे. यामुळे जागतिक बाजारपेठेत अमेरिकन डॉरसमोर मोठे आव्हान निर्माण होणार आहे. सध्या जागतिक व्यापारातील बहुतांश व्यवहार केवळ डॉलरमध्येच होतात. रशियातील कझान येथे सुरू असलेल्या ब्रिक्स परिषदेत या वेळी 'पूर्व विरुद्ध पश्चिम' या मुयाला विशेष महत्त्व देण्यात आले. जगातील तीन मोठा आर्थिक शक्ती व्यासपीठावर एकत्र येण्यावर संपूर्ण पाश्चिमात्य देशांचे डोळे याकडे लागले होते. या परिषदेत भारत, रशिया आणि चीननेही अमेरिकेला व्यापारावर थेट आव्हान देण्याचे संकेत दिले आहेत. 'ब्रिक्स' मध्ये समाविष्ट असलेल्या देशांनी आता डॉलरऐवजी स्थानिक चलनात व्यापार करण्यास सांगितले आहे. याचा अर्थ भारत या देशांशी डॉलरऐवजी रुपयामध्ये व्यवहार करू शकणार आहे. सध्या जागतिक व्यापारातील व्यवहार डॉलरमध्ये होतात. प्रिक्स देशांनी बुधवारी व्यावर वाढवण्यास आणि स्थानिक चलनांमध्ये आर्थिक सेटलमेंटची व्यवस्था निर्माण करण्याचे मान्य केले. स्वतंत्रपणे कार्यरत क्रॉस बॉर्डर सेटलमेट आणि डिपॉझिटरी इन्स्ट्रक्चर आणि ब्रिक्स पुनर्विमा कंपनीच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यावरही या परिषदेमध्ये सहमती झाली. परिषदेत सदस्य देशांच्या नेत्यांनी 21 व्या शतकात नवीन प्रकारची बहुपक्षीय विकास बैंक म्हणून नवीन विकास बैंक विकसित करण्यास सहमती दर्शवली आणि 'ब्रिक्स' नेतृत्वाखालील बँकेच्या सदस्यत्वाचा विस्तार करण्यास समर्थन दिले. सोळाव्या 'ब्रिक्स' परिषदेनंतर जारी करण्यात आलेल्या घोषणेमध्ये म्हटले आहे की सदस्य देश स्थिरता राखण्यासाठी आणि ऑपरेशनल स्तरावर सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी डिजिटल पायाभूत सुविधा क्षेत्रात संयुक्त उपक्रमांची शक्यता तपासतील. 'ब्रिक्स' देशातील नेत्यांनी 21 व्या शतकातील मानवी जीवनाच्या सर्व पैलूंच्या वेगवान डिजिटलायझेशन प्रक्रियेबद्दल चिंता व्यक्त केली आणि विकासासाठी डेटाची महत्त्वपूर्ण भूमिका आणि या समस्येचे निराकरण करण्यासाठी 'ब्रिक्स' मध्ये प्रतिवद्धता अधिक तीव्र करण्याची गरज लक्षात घेतली. या शिखर परिषदेला मोदी, रशियाचे अध्यक्ष व्यादिमीर पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह ब्रिक्स देशांचे प्रमुख नेते उपस्थित होते. या प्रसंगी 'ब्रिक्स' त्यांनी समूहातील 'करस्पाँडंट बैंकिंग नेटवर्क' मजबूत करण्याचे आणि 'ब्रिक्स' क्रॉस बॉर्डर पेमेंट इनिशिएटिव्ह (बीसीबीपीआय) च्या अनुषंगाने स्थानिक चलनांमध्ये सेटलमेंट सक्षम करण्याचे आवाहन केले. 'ब्रिक्स' मध्ये यापूर्वी ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यांचा समावेश होता. स्वत आता पाच अतिरिक्त सदस्य इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेविय आणि संयुक्त अरव अमिरातीचाही समावेश करण्यात आला आहे.

'ब्रिक्स' देशांचे अर्थमंत्री आणि केंद्रीय बैंक गव्हर्नर यांना स्थानिक चलने, पेमेंट उत्पादने आणि प्लॅटफॉर्मच्या मुद्दयावर चर्चा सुरू ठेवण्याचे या प्रसंगी सांगण्यात आले. आपल्या सदस्य देशांच्या पायाभूत सुविधा आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी 'न्यू डेव्हलपमेंट बँक' (एनडीबी) ची भूमिका लक्षात घेऊन 'ब्रिक्स' नेत्यांनी 2022 2026 साठी कॉर्पोरेट प्रशासन आणि कात्मक परिणामकारकता मजबूत करण्यास सहमती दर्शविली. अर्थात गोव्यात झालेल्या परिषदेत 'ब्रिक्स' परिषदेत डॉलरला शह देण्यासाठी स्वतंत्र चलन देण्याची भाषा झाली होती. त्यावात गेल्या पाच वर्षांमध्ये काहीच झाले नाही. आता पुन्हा तीच भाषा सुरु झाली आहे.

## पान १ वरून...

पान १ वरून...

### दिवाळीच्या सलग सुट्यांमुळे महाबळेश्वर...

महाबळेश्वरचे मुख्य आकर्षणाचे ठिकाण, नौकाविहारासाठी प्रसिद्ध वेण्णालेक येथे नौकाविहारासाठी पर्यटकांच्या रांगा लागल्या आहेत. पर्यटक नौकाविहार करताना पाहावयास मिळत आहेत, तर हौशी पर्यटक वेण्णालेकवर घोडेसवारीचा आनंद लुटताना दिसत आहेत. वेण्णालेकवर बच्चे कंपनीसाठी गेम्सची धूम वेण्णालेकवर सुरू आहे. जणू 'जत्रे'चाच माहोल आहे. खवय्यांसाठी स्ट्रॉबेरीपासून बनविलेले विविध खाद्यपदार्थ, गरमागरम मका कणीस, फ्रँकी, पॅटिस, पाणीपुरी, भेळ, पावभाजी अशा पदार्थांवर ताव मारताना पर्यटक पाहावयास मिळत आहेत.

### डोंबिवलीतील १९ बेशिस्त वाहनचालकांवर...

मालवाहू वाहनांसह इतर प्रवासी या वाहतूक कोंडीमध्ये अडकले होते. वाहतूक कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांच्या नाकीनऊ आले होते. विरुद्ध मार्गिकेतून वाहने चालवून सार्वजनिक वाहतुकीला अडथळा, तसेच धोकादायक परिस्थिती निर्माण करणाऱ्या चालकांवर वाहतूक विभागाचे हवालदार सुनील उगलमुगले यांच्या तक्रारीवरून बेशिस्त १९ चालकांविरुद्ध मानपाडा पोलिस ठाण्यात रस्ते सुरक्षा मानकाचा भंग केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये रिक्षावाल्यांसह कार चालकांचा समावेश आहे.

### मतदारांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक...

या बैठकीत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील बूथ व त्या ठिकाणी करण्यात येत असलेल्या सुविधा याबाबतची माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून अभियंत्यांकडून घेतली. तसेच विधानसभा मतदान केंद्राची पाहणी आपण स्वत: तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघात नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

ठाणे जिल्हयातील १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी सूचना फलक, दिशादर्शक, दिव्यांगासाठी रॅम्पची सुविधा, मतदार सहाय्य केंद्र, पुरेशी व्यवस्था, मंडप व्यवस्था,पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छ स्वच्छतागृहे, प्रतिक्षालय, रांगेतील मतदारांसाठी खुर्च्यांची व्यवस्था तसेच मंडपात असलेल्या मतदान केंद्रानजीक मोबाईल टॉयलेटची व्यवस्था, प्रथमोपचार सुविधा, मतदान केंद्रावर पाळणाघर, तसेच दिव्यांगासाठी व्हीलचेअरची सुविधा, पार्टीशन मध्ये तयार करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर लावण्यात येणाऱ्या रांगांसाठी जागेची उपलब्धता आदी सर्व सुविधा देण्याच्या दृष्टीने प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नियोजन करावयाचे आहे.

### विक्रमगडमधील आदिवासी वारली...

मुळात आदिवासींची नाळ ही निसर्गाशी अनादीकाळापासून जोडली आहे. त्यामुळे नदी, नाले, झाडे, पशु, जमीन, जल यांच्याशी आदिवासी एकरूप झाले आहेत. निसर्गातील ऋतूमानानुसार होणारे वातावरणातील बदल हे आदिवासी अनुभवत असतो आणि हेच त्यांचे जीवमान आपल्या चित्रशैलीमधून रेखाटन करत असतो. आदिवासी संस्कृती पूर्वी सण, उत्सव, लग्न कार्य यामधून दिसत होती. मात्र बदल्यात काळात हीच आदिम संस्कृती हळूहळू लोप पावत चालली असताना काही आदिवासी यांच्या उपस्थित भारतीय आदिवासी वारली चित्रकला आदिवासी चित्रकारांनी त्यांना समजून सांगितली. चित्रकार आदिवासी संस्कृतीचे चित्रशैलीद्वारे जतन करण्याचे काम करत आहेत. ह्याच आदिवासी चित्रशैली चे नऊ दिवसाचे शिबिर इंडिया हॅबिटेट सेंटर दिल्ली येथे आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्यामधून विक्रमगड येथील चित्रकार कृष्णा भुसारे व डहाणू गंजाड मधून प्रवीण म्हसे यांनी दिल्ली येथे या शिबीरात सहभागी झाले होते. त्यामध्ये विदेश मंत्री डॉ. एस. जयशंकर व पर्यटन व सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांच्या उपस्थित भारतीय आदिवासी वारली चित्रकला आदिवासी चित्रकारांनी त्यांना समजून सांगितली. यावेळी राष्ट्रपती भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी पूर्ण भारतातून पंधरा आदिवासी कलाकारांना बोलावले होते. कृष्णा भुसारे यांनी आपली वारली चित्रकला आणि राष्ट्रपती भावनावी एकूण (पाच) चित्र तयार केली तसेच प्रवीण म्हसे यांनी (दोन) चित्र तयार केली.

### सूरतमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचं...

तुमचे कितीही जन्म गेले तरी माझा महाराष्ट्र तुमच्या खोक्यात मावू शकणार नाही असेही उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच मी उमेदवारी दिली, मान सन्मान दिला, प्रेम दिले.सगळं देऊन शिवसेना सारख्या आईवर वार कसा काय करु शकतो असे म्हणत शिवसेना सोडलेल्यांवर ठाकरेंनी जोरदार निशाणा साधला.

### राज्याच्या नव्या पोलीस महासंचालकपदी...

त्यानंतर मंगळवारी संजय वर्मा यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.रश्मी शुक्ला यांच्यावर फोन टॅपिंग प्रकरणी त्यांचे नाव आले होते. त्या अनुशंगाने काँग्रेसकडून त्यांना हटविण्याची मागणी करण्यात आली होती. रश्मी शुक्ला यांच्यानंतर पोलीस महासंचालकपदासाठी तीन अधिकाऱ्यांची नावे चर्चेत होती. राज्य सरकारने या पदासाठी तीन नावांची शिफारस केली होती. त्यात रितेश कुमार, संजय वर्मा आणि विवेक फणसाळकर यांच्या नावाचा समावेश होता. यापैकी संजय वर्मा यांच्या नावावर आता शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

### ठाण्यात निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर...

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर अतिरक्त मनुष्यबळ तैनात केला जात असतो.त्यामुळे केंद्रीय पोलीस पथकातील सात तुकड्या ठाणे आयुक्तालय क्षेत्रात दाखल झाल्या आहेत. तर पाच तुकड्या लवकरच दाखल होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली. यासह राज्य राखीव दलाच्या तुकड्या देखील तैनात केल्या आहेत. पोलिसांकडून गुन्हेगारांवरही करडी नजर ठेवण्यात येत आहे. प्रतिबंधात्मक कारवाई देखील पोलिसांनी सुरू केल्या आहेत. रात्रीच्या वेळेत पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांकडून गस्ती घातली जात आहे. मागील काही दिवसांपासून पोलिसांनी बेकायदा शस्त्र पोलिसांकडून जप्त केले आहे. तसेच संवेदनशील मतदारसंघात पोलिसांचा रुट मार्च काढला जात आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्या कार्यालयाचे मुख्यमंत्र्यांच्याहस्ते उद्घाटन




**कल्याण (विवेक गुंजाळ) :** लाडकी बहिण योजना बंद करण्यासाठी महाविकास आघाडी दोनदा न्यायालयात गेली असून न्यायलयाने त्यांना फटकारले आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यास या योजनेशी संबंधित अधिकाऱ्यांना आणि नेत्यांना जेल मध्ये टाकण्याची भाषा महाविकास आघाडीचे नेते करत असून लाडकी बहिण योजना सुरू राहण्यासाठी एका वेळा काय दहा वेळा जेल मध्ये जाण्यास तयार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. कल्याणमध्ये महायुतीचे उमेदवार आमदार विश्वनाथ भोईर यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

सावत्र भाऊ दुष्ट भाऊ विरोधासाठी एकत्र आले आहेत त्यांना जागा दाखवायची वेळ आली आहे. दिवाळीचे फटाके सर्वत्र फुटत आहेत, या निवडणुकीत आपल्याला ॲटम बॉम्ब फोडायचे आहेत विरोधकांच्या खुर्ची खाली फटाके फुटायला लागल्या असून आताच छोट्या मोठ्या लवांग्या फुटायला लागल्या आहेत असा ही टोला नाव न घेता विरोधकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याणात लगावला. तुमच्या आघाडी सरकारने अडीच वर्षांत काय केले? आणि महायुती सरकारने दोन वर्षांत काय केले हे होऊन जाऊ द्या दूध का दूध पानी का पानी, आम्ही हिशोब द्यायला




तयार असून तुम्ही काय केले ते सांगा अशा शब्दांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीला खुले आव्हान दिले. आमचे सरकार हे देना बँक आहे लेना बँक नाही. हे तुमच्या खात्यामध्ये 5 हफ्ते भरणारे सरकार आहे. पूर्वीचे सरकार हे हफ्ते घेणारे होते. त्यामुळेच त्यांचे मंत्री, अधिकारी जेलमध्ये गेले. पण आमचे सरकार हे तुमच्या खात्यामध्ये हफ्ते भरणारे सरकार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान या उद्घाटन सोहळ्याला शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, रिपाई महायुतीचे प्रमुख नेते, शेकडो समर्थक आणि हजारो लाडक्या बहिणी उपस्थित असल्याने प्रचंड मोठी गर्दी झाली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कार्यक्रमस्थळी दाखल झाल्यावर स्टेजपर्यंत पोहोचण्यासाठी पोलीस प्रशासन आणि त्यांचे सुरक्षारक्षक यांची चांगलीच दमछाक झाल्याचे दिसून आले.

## कारच्या छतावरून फटाक्यांची आतषबाजी, ठाण्यात गंभीर प्रकार, चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**ठाणे (रोहित जैसवार):** ठाण्यातील निळकंठ भागात वाहनांच्या छतावरून काही हुल्लडबाज तरुणांनी फटाक्यांचा खोका हातात पकडून फटाक्यांची आतषबाजी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आतषबाजी करताना कार देखील चालविली जात होती. या याप्रकरणाचे चित्रिकरण समाजमाध्यमावर प्रसारित झाल्यानंतर चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निळकंठ भागात दिवाळी सणाच्या दिवशी मोटार वाहनाच्या छतावर उभे राहून फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली होती. विशेष म्हणजे, तरुणांनी हातामध्ये फटाक्यांचा खोका पकडला होता. वाहन चालवित असताना ही आतषबाजी केली जात होती. अखेर याप्रकरणाची दखल घेत चितळसर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत सांगळे यांनी तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता कलम १२५, २८७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ नुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## मुबारड मतदारसंघात रोजगार व विकास कामांना पहिले प्राधान्य देणार! शैलेश वडनेरे यांचे प्रतिपादन!



**मुरबाड (गणेश बागडे)** - मुरबाड मतदार संघाच्या निवडणुकीत माघारीच्या दिवशी आपली उमेदवारी कायम ठेवून त्यांनी मुरबाड मतदारसंघात उमेदवारी लढवण्यासाठी कंबर कसली आहे.असे प्रतिपादन अपक्ष उमेदवार शैलेश वडनेरे यांनी दिली आहे.

माऊली सभागृहात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना सांगितले की या मतदारसंघात ४० वर्षात किती विकास झाला आहे व त्यांनी किती प्रोजेक्ट राबवले आहेत हेही आजही कळत नाही त्यामुळे मला नुकताच मिळालेली निशाणी ही बॅट्समन आहे त्यामुळे आता मुरबाड तालुक्यात चांद्या पासून ते बांद्यापर्यंत किती विकास झालाय याचा शोध घेऊन खऱ्या अर्थाने विकासाला मी चालना देणार आहे त्यामध्ये रोजगार, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, रस्त्याची दुरावस्था ,या मूलभूत सोयी सुविधा लक्षात घेऊन यावर मी जास्त भर देणार आहे. तसेच मी एक सिव्हिल इंजिनिअर आहे. त्यामुळे मला विकास कामाची चांगलीच माहिती आहे.

या मतदारसंघात यापूर्वीच मी चांगलाच शोध घेतलेला आहे. त्यामुळे मी सतत लोकांच्या सुखदुखात सामील झालो आहे. त्यामुळे निश्चित मला या मतदारसंघात लोक स्वीकारतील याची मला खात्री आहे आणि मला मिळालेली निशाणी बॅट्समन आहे त्यामुळे मी या मतदारसंघात जोरदार बॅटिंग करणार यावेळी तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोंबिवलीचे पाणी सोप्या पद्धतीने ठाण्याला परिणाचे षडयंत्र-मनसेचे आमदार राजू पाटील



**डोंबिवली (सम्यक कासारे)** – एका भागाचे पाणी दुसऱ्या भागात. दुसऱ्या भागाचे पाणी अन्य भागात असे उद्योग काही मंडळींकडून कल्याण ग्रामीणमध्ये सुरू आहेत. बारवी धरणातील नवी मुंबईच्या वाट्याचे १४० दशलक्ष पाणी २७ गाव, एमआयडीसी, डोंबिवली भागाला मिळावे म्हणून १५ वर्षांपूर्वी निर्णय झाला आहे. हे पाणी २७ गावांसह डोंबिवली शहर परिसराला मिळावे म्हणून आपण प्रयत्नशील आहोत. परंतु, काही जण हे पाणी हळुहळू ठाण्याला पळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत, असा घणाघात मनसेचे कल्याण ग्रामीणचे उमेदवार प्रमोद उर्फ राजू पाटील यांनी सोमवारी येथील पहिल्या प्रचारसभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा नामोल्लेख टाळून केला. हे चोरच आहेत. पाणी चोरही आहेत. यांचा आमदारही आता पाणी चोरच असणार आहे, अशी पुष्टी राजू पाटील यांनी जोडली. कल्याण लोकसभा निवडणुकीच्यावेळी मनसेची महायुतीला साथ होती. त्यावेळी मनसेचे राजू पाटील यांनी कल्याण ग्रामीणमधून उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासाठी जोरदार प्रयत्न केले होते. या बदल्यात कल्याण ग्रामीणमधील काही कामे मार्गस्थ लावण्याचे आश्वासन खासदार शिंदे यांनी राजू पाटील यांना दिले होते. आता मदत करण्याची वेळ आली तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याण ग्रामीणमध्ये राजेश मोरे यांना उमेदवारी देऊन राजू पाटील यांच्यासमोर आव्हान उभे केले आहे. पलावा येथील वाहन कोंडीमुळे प्रवासी त्रस्त आहेत. या भागातील उड्डाण पूल, दुसरा एक पूल मार्गी लागावा म्हणून आपण प्रयत्नशील आहोत. पलावा चौकातील कामाचे आदेश ठेकेदाराला नसताना ते काम दामटून सुरू केले होते. दुसऱ्या पुलाच्या कामात अनधिकृत बांधकामे आहेत. ती वाचविण्यासाठी दुसऱ्या पुलाचे काम रखडविण्यात आले आहे. या बांधकामांवर यापूर्वी कारवाई झाली होती.

## नरेंद्र पवारांची जबाबदारी आपण आणि देवेंद्रेजींनी घेतलीय - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पवार समर्थकांना ग्वाही



**कल्याण (आकाश कांबळे) :** बराज्यामध्ये अडीच वर्षे महाविकास आघाडीची सत्ता असताना आपण सर्व जण वनवासात होतो. मात्र आपल्याला पुन्हा एकदा वनवासात जायचे नसून त्यासाठी महायुतीचे सरकार येणे आवश्यक असल्याचे सांगत नरेंद्र पवार यांची जबाबदारी आपण आणि देवेंद्र फडणवीसांनी घेतल्याचे सूतोवाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. माजी आमदार नरेंद्र पवार यांनी कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्याविरोधात दाखल केलेली उमेदवारी मागे घेतली. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याणातील निवडणूक कार्यालयाच्या उद्घाटनानंतर नरेंद्र पवार आणि त्यांच्या समर्थकांची पवार यांच्या निवासस्थानी भेट घेत नरेंद्र पवार तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यावेळी राज्यामध्ये पुन्हा एकदा महायुतीची सत्ता पुन्हा येणे आवश्यक असल्याचे नरेंद्र पवार आणि त्यांच्या समर्थकांना पटवून दिले. त्यावेळी काही जणांनी मग नरेंद्र पवार यांचे काय असा थेट प्रश्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केला. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपण आणि देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची जबाबदारी घेतली असल्याचे स्पष्ट करताच उपस्थित समर्थकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्याचे स्वागत केले. तर नरेंद्र पवार यांनी कल्याण मेट्रो, रिंगरोड प्रकल्प, घनकचरा प्रकल्प, मल्टीस्पेशलेटी हॉस्पिटल आणि डॉ. आंनदीबाई जोशी स्मारक प्रकल्प रखडल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगितले.

## ठाणे जिल्ह्यात ९० उमेदवारांची निवडणुकीतून माघार, जिल्ह्यात २४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात



**ठाणे (सुचित शिंदे) :** ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या ४७ उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने त्यांचे आमदार होण्याचे स्वप्न भंगले असतानाच, त्यापाठोपाठ सोमवारी उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी ३३४ उमेदवारांपैकी ९० उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. यामुळे जिल्ह्यात २४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. ठाणे जिल्ह्यात एकूण १८ विधानसभा मतदारसंघ येतात. यामध्ये भिवंडी ग्रामीण, शहापूर, भिवंडी पश्चिम, भिवंडी पूर्व, कल्याण पश्चिम, मुरबाड, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण पूर्व, डोंबिवली, कल्याण ग्रामीण, मिरा-भाईंदर, ओवळा-माजीवडा, कोपरी पाचपाखाडी, ठाणे शहर, मुंब्रा-कळवा, ऐरोली, बेलापूर या मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघांमध्ये निवडणूक लढण्यासाठी ३८१ उमेदवारांनी ४९५ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. महायुती, महाविकास आघाडी, अपक्ष, बंडखोर उमेदवारांचा समावेश होता. हे सर्वजण निवडणूक लढण्याची तयारी करीत होते. परंतु अर्ज छाननी प्रक्रियेत ४७ उमेदवारांचे ७८ अर्ज बाद झाले आहेत. यामुळे हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर पडल्याने त्यांचे आमदार होण्याचे स्वप्न भंगले. असे असले तरी बंडखोरांमुळे महायुती, महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढली होती. दरम्यान, साम, दाम, दंड, भेद या सर्व पर्यांचा वापर करूनही काही ठिकाणी बंडोबांनी माघार घेतलेली नाही. तर, जिल्ह्यात काही ठिकाणी बंडोबांसह अपक्षांनी माघार घेतली. जिल्ह्यात सोमवारी उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी ३३४ उमेदवारांपैकी ९० उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. यामुळे जिल्ह्यात २४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. यामुळे १८ विधानसभा मतदारसंघांतील उमेदवारांची यादी आता अंतिम झाली असून या उमेदवारांमध्ये आता लढती होणार आहेत. त्यात कोण बाजी मारणार, हे येत्या २३ नोव्हेंबरला स्पष्ट होईल. भिवंडी ग्रामीणमध्ये ७ उमेदवार, शहापूरमध्ये ९ उमेदवार, भिवंडी पश्चिममध्ये १४ उमेदवार, भिवंडी पूर्वमध्ये ११ उमेदवार, कल्याण पश्चिममध्ये २४ उमेदवार, मुरबाडमध्ये ९ उमेदवार, अंबरनाथमध्ये २२ उमेदवार, उल्हासनगरमध्ये २१ उमेदवार, कल्याण पूर्वमध्ये १७ उमेदवार, डोंबिवलीमध्ये ८ उमेदवार, कल्याण ग्रामीणमध्ये १३ उमेदवार, मिरा-भाईंदरमध्ये १७ उमेदवार, ओवळा-माजीवाडामध्ये १४ उमेदवार, कोपरी पाचपाखाडीमध्ये ९ उमेदवार, ठाणे शहरमध्ये ८ उमेदवार, मुंब्रा-कळवामध्ये ११ उमेदवार, ऐरोलीमध्ये १७ उमेदवार आणि बेलापूरमध्ये १५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

### भिवंडीत २ कोटी ३० लाखांची रोकड जप्त

## एसीपी सचिन सांगळे यांच्यासह शांतीनगर पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी



**ठाणे ( यश सावंत )-** भिवंडीतील धामणकर नाका ते मानकोलीदरम्यान एका गाडीतून २ कोटी ३० लाख १७ हजार ६०० रुपये जप्त करण्यात आले. ही कारवाई विधानसभा निवडणुकी २०२४ च्या अनुषंगाने सतर्क असलेल्या एसीपी सचिन सांगळे व शांती नगर पोलीस ठाण्याचे सपोनि घोलप, अंमलदार चव्हाण, लोखंडे यांनी केली.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्रात निवडणूक आयोगाची पथके व राज्य पोलीस दलाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. मतदानाच्या काळात राजकीय पक्षांकडून मतदारांना पैशांचे वाटप, भेटवस्तू देण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेत ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी आदर्श आचारसंहिताचे पालन होण्यासाठी सर्वच पोलीस ठाण्यांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने पोलिस संशयित वाहनांची झडती घेत असताना एका गाडीत एसीपी सचिन सांगळे व शांती नगर पोलीस ठाण्याचे सपोनि घोलप, अंमलदार चव्हाण, लोखंडे यांना २ कोटी ३० लाख १७ हजार ६०० रुपये आढळले. या रकमेबाबत चालक महेंद्र पांडे याच्याकडे काहीएक कागदपत्रे नव्हती. पुढील कारवाईसाठी गाडी सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयात आणण्यात आली. तेथे एफ. एस.टी. क्रमांक ६,१३७ भिवंडी पूर्व विधानसभेच्या ( पथकाचे सहाय्यक खर्च निरीक्षक शरद यादव, एमसीसी नोडल ऑफिसर गुरव,आयकर निरीक्षक पवन कौशिक यांना तात्काळ माहिती देऊन सदर ठिकाणी पाचारण केले. या रकमेबाबत कोणतीही कागदपत्रे नसल्याने ही रक्कम जप्त करून आयकर विभागाकडे सुपूर्द करण्यात आली आहे.

## ऐरोलीतील बंडाला नाईक विरोधकांची साथ, उमेदवारासह नेतेही नॉट रिचेबल



**नवी मुंबई (धनश्री सट्टा):** ठाणे जिल्ह्यातील भाजपचे बडे नेते गणेश नाईक यांच्यासाठी कोणत्याही परिस्थितीत निवडणूक सोपी होऊ द्यायची नाही असा चंग बांधत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नवी मुंबईतील कडव्या समर्थकांनी एकत्र येत बंडखोर उमेदवार विजय चौगुले यांना रिंगणात कायम ठेवण्याचा घेतलेला निर्णय ठाणे आणि नवी मुंबईतील राजकीय संघर्षाचा परिणाम असल्याची चर्चा येथील राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. चौगुले यांच्यावर उमेदवार माघारीसाठी दबाव येऊ नये यासाठी गेल्या दोन दिवसांपासून उमेदवारासह शिंदेसेनेचे ऐरोलीतील प्रमुख प्रभावी नेते 'नॉट रिचेबल' झाल्याचे पहायला मिळाले. विशेष म्हणजे, या भागातील काँग्रेस आणि उद्धव सेनेच्या काही नेत्यांनीही साथ देण्याचा शब्द दिल्याने चौगुले यांच्या बंडाला हवा मिळाल्याची चर्चा आहे. ऐरोली विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे उमेदवार एम.के.मढवी यांना यापूर्वीच उमेदवारी जाहीर केली आहे. ऐरोलीतील तीन प्रभागांमध्ये प्रभाव असणारे मढवी संपूर्ण मतदारसंघात फारसे प्रभावी नाहीत. तसेच मढवी आणि सर्वच पक्षातील राजकीय नेत्यांचेही फारसे काही सख्य नाही.

## बॉम्बे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्चमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**कल्याण, (सम्यक कासारे) :**यशवंतराव भोसले एज्यूकेशन सोसायटी संचलित बॉम्बे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्च, डोंबिवली या महाविद्यालयामध्ये 'औषधनिर्मितीतील नाविन्यपूर्ण संशोधन' या विषयावरील 'बीआरपीआय-इंटफार्मकॉन-२०२५' ही पहिली एक-दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न झाली. जगभरातील १८५ विद्यार्थी, शिक्षक संशोधकांनी या परिषदेमध्ये सहभाग नोंदवला.

आधुनिक औषधशास्त्र आणि रोगप्रतिकारक उत्पादने यांच्या सहाय्याने फुफ्फुसाच्या आजाराशी लढा या विषयावर तंत्रज्ञान विद्यापीठ सिडनी, ऑस्ट्रेलिया येथील डॉ. कलम दूवा; ऑस्टियोपोरोसिस बरा करण्यासाठी पेप्टाइड थेरप्यूटिक्सचा आधुनिक पद्धतीने वापर या विषयावर रासायनिक तंत्रज्ञान संस्था, मुंबईच्या डॉ. वंदना पत्रावळे; विविध रोग यशस्वीपणे बरे करण्यासाठी आतड्यातील सूक्ष्मजंतूंचा वापर या विषयावर



लवली प्रोफेशनल विद्यापीठ, पंजाब येथील डॉ. सचीनकुमार सिंग; डिजिटल थेरप्यूटिक्स: आरोग्यसेवेतील नवीन तंत्रज्ञान महर्षी दयानंद विद्यापीठ, हरियाणा येथील डॉ. हरिश दुरेजा; शाश्वत औषध संशोधन आणि निर्मितीमध्ये हरित रसायनशास्त्राचे महत्व या विषयावर पॉन्टिफिकल कॅथोलिक विद्यापीठ, चिली च्या डॉ. फ्लॅवीया झूकोनी; मेंदूशी संबंधित रोग बरे करण्यासाठीच्या औषधनिर्माणशास्त्रातील प्रगत पद्धती या विषयांवर अजमान विद्यापीठ, संयुक्त अरब अमिराती चे डॉ. गौरव गुप्ता यांची व्याख्याने झाली. परिषदेचा उद्घाटन सोहळा इव्होनिक इंडिया प्रा. लि. चे संचालक डॉ.आशिष गुहा तर सांगता समारंभ ए.सी.जी कॅप्सूल चे जागतिक उत्पादन व्यवस्थापन प्रमुख डॉ. सुभाषीश चक्रबोर्ती यांच्या शुभहस्ते पार पडला. डॉ. परिझाद एलचिदाना आणि प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा व्याख्यानसत्रांचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

ऑनलाईन पद्धतीने संशोधन पोष्टर स्पर्धचे आयोजन करण्यात आले. डॉ. समीर नदाफ आणि डॉ. दुर्गाचरण भागवत यांनी पोस्टर्सचे तसेच डॉ. सचिनकुमार पाटील आणि डॉ. अमोल शेटे यांनी पोस्टर्स सादरीकरणाचे मूल्यमापन केले.

# माहेरी गेलेल्या जान्हवी किल्लेकरचं घरी 'असं' झालं स्वागत



अभिनेत्री जान्हवी किल्लेकर ही सध्या विविध कारणांमुळे चर्चेत आहे. अभिनेत्री सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या संपर्कात असल्याचे पाहायला मिळते. सध्या तिने शेअर केलेल्या एका व्हिडीओची मोठी चर्चा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. जान्हवी किल्लेकरने शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कमेंट्स करीत प्रतिक्रिया दिल्या आहेत.

**माहेरी स्वागत**

जान्हवीने नुकताच सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. हा व्हिडीओ शेअर करताना जान्हवीने 'माहेरी स्वागत', असे लिहिले आहे. जान्हवी माहेरी गेली असून, तिचे हळद-कुंकु लावून, आरती ओवाळून स्वागत करण्यात आल्याचे पाहायला मिळत आहे. आरतीच्या आधी तिने पायातील चप्पल काढून बाजूला ठेवल्याचे दिसत आहे. ओवाळणी झाल्यानंतर तिने तिच्या मुलालादेखील पाया पडायला लावल्याचे या व्हिडीओमध्ये पाहायला मिळाले. तिचा हा व्हिडीओ लक्ष वेधून घेत आहे. या व्हिडीओवर खारी हे गाणे लावले आहे. आता नेटकऱ्यांनी तिच्या या व्हिडीओवर मोठ्या प्रमाणात कमेंट्स केल्याचे पाहायला मिळाले.

**काय म्हणाले नेटकरी?**

जान्हवीने शेअर केलेल्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत तिचे कौतुक केले आहे. तिच्यातील हे बदल सकारात्मक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एका नेटकऱ्याने म्हटले, "निगेटिव्ह लोकांना आज पॉझिटिव्ह केलं. वेगळंच रसायन आहे तुझ्यात. सोपं नाही महाराष्ट्राला जिंकणं." दुसऱ्या एका नेटकऱ्याने म्हटले, "बिग बॉसमध्ये निगेटिव्ह दिसली; पण तुझं मन खरंच खूप छान आहे ताई. छान, खूप प्रेम." आणखी एका नेटकऱ्याने, "ताई, तुम्ही आपल्या भारतीय संस्कृती जपता", असे म्हणत तिचे कौतुक केले आहे. याबरोबरच, "तुझा शेवटचा नऊ लाख घेण्याचा निर्णय मला खूप आवडला तेव्हापासून मी तुझी चाहती झाली आहे. तू खूप हुशार आहेस जान्हवी. तुझ्यामध्ये खेळाडू वृत्ती आहे", "सूरजनंतरचा लकी माणूस म्हणजे जान्हवी", "असं प्रेम कुणालाही मिळत नाही जान्हवी. तू खूप नशीबवान आहेस", अशा प्रकारच्या कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्याचे पाहायला मिळत आहे.

**जान्हवी किल्लेकरचा बिग बॉसमधील प्रवास**

बिग बॉस मराठीच्या पाचव्या पर्वात जान्हवी सहभागी झाली होती. या पर्वात सहभागी झाल्यापासूनच ती मोठ्या चर्चेत आली होती. जान्हवी किल्लेकर तिच्या विधानामुळे, निक्की, अरबाज, वैभव यांच्याबरोबरच्या मैत्रीमुळे आणि तिच्या टास्क खेळण्यामुळे सतत चर्चेत होती. तिच्या खेळावर प्रेक्षकांसह कलाकारांनीदेखील प्रतिक्रिया दिल्याचे पाहायला मिळाले. तिच्यावर मोठी टीकादेखील झाल्याचे दिसले. मात्र, शोच्या शेवटी जान्हवीने नऊ लाख घेत शोमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. तिच्या या निर्णयाचे मोठे कौतुक झाले. जान्हवी सहाव्या स्थानावरून बिग बॉस मराठीच्या शोमधून बाहेर पडली.

दरम्यान, बिग बॉस मराठी ५ नंतर जान्हवी किल्लेकर मोठ्या चर्चेत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून ती प्रेक्षकांच्या संपर्कात असते. याबरोबरच विविध कार्यक्रमांनादेखील ती हजेरी लावताना दिसते. नुकतीच ती सूरज चव्हाणच्या घरी गेल्यामुळे चर्चेत आली होती. आता बिग बॉस मराठीनंतर ती कोणत्या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मी मावशी झालेय!..'१४ वर्षांनी आई झाली तेजस्विनी पंडितची बहीण





सुप्रसिद्ध अभिनेत्री आणि निर्माती तेजस्विनी पंडीत सध्या तिच्या 'येक नंबर' चित्रपटामुळे प्रकाशझोतात आहे. तिने निर्मिती केलेला आणि अभिनय केलेला 'येक नंबर' चित्रपट १० ऑक्टोबरला थिएटरमध्ये रिलीज झालेला आहे. एकीकडे चित्रपटाची चर्चा तर दुसरीकडे तेजस्विनीनं शेअर केलेल्या पोस्टनं सगळ्यांचं लक्ष वेधलं. तेजस्विनीनं पोस्ट शेअर करत तिच्या चाहत्यांसोबत एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. तेजस्विनीनं ही पोस्ट तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तेजस्विनीनं नुकत्याच जन्माला आलेल्या बाळानं हात पकडल्याचे फोटो शेअर केले आहेत. तेजस्विनीची बहीण पौर्णिमा पुल्लन हिने एका गोंडस बाळाला जन्म दिला आहे. तब्बल 14 वर्षानंतर तेजस्विनीची बहीण पौर्णिमा आई झाली आहे. तर तेजस्विनी मावशी झाली आहे. अभिनेत्रीने शेअर केलेल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये आनंद पाहायला मिळत आहे. "माझ्यासाठीची सगळ्यात 'मोठी', सगळ्यात 'खास' आणि आयुष्यभराची 'दिवाळी भेट' माझ्या बहिणीने आणि दार्जींनी मला दिली आहे. आमच्या घरात 'लक्ष्मी' आली! अनेक वर्ष ह्या सुखाचा अनुभव घेण्यासाठी आम्ही सर्वच आसुसलेले होतो. माझ्या माणसांच्या आयुष्यातला 14 वर्षांचा अपत्य प्राप्तीसाठीचा वनवास यंदाच्या दिवाळीत संपला. त्या हॉस्पिटलच्या फेऱ्या, तिथली धावपळ, अचानक उद्भवलेले अडथळे या सगळ्यात आजूबाजूला सणाचे वातावरण आहे हे विसरायला झालं होतं पण या सगळ्यावर मात करत आमचे दिवाळीचे क्षण च नव्हे तर आयुष्य देखील या 'कन्यारत्नाने' उजळून टाकले! आमच्या कुटुंबाची "कथा" सुफळ संपूर्ण म्हणुया ? ही दिवाळी माझ्यासाठी एकदम खास आहे, मी मावशी झालेय! होऊ दे खर्च... तुम्हा सर्वांना दीपावलीच्या खूप खूप शुभेच्छा! शुभ दीपावली! शुभं भवतु"! तिचे चाहते नाही तर त्यासोबत सेलिब्रिटींनी देखील तिच्या पोस्टवर कमेंट करत तेजस्विनी, तिची बहिण पूर्णिमा आणि विनीतला शुभेच्छा दिल्या आहेत.

# मराठी अभिनेत्रींना हिंदीत दिलं जातं कामवाल्या बाईचं काम, तृप्ती खामकरने सांगितलं पडद्यामागचं सत्य



मराठी सिनेसृष्टीतील असे अनेक कलाकार मंडळी आहेत, ज्यांनी आपल्या अभिनयाची छाप हिंदी सिनेसृष्टीत उमटवली आहे. सिद्धार्थ जाधव, अमृता खानविलकर, प्रिया बापट, मुक्ता बर्वे, क्षिती जोग, वैभव तत्ववादी, अमेय वाघ, गिरीजा ओक, अनुजा साठे, सौरभ गोखले, श्रुती मराठे अशी अनेक मराठी कलाकारांची नाव आहेत; जे सातत्याने हिंदी चित्रपटात काम करताना दिसत आहेत. पण बऱ्याचदा मराठी अभिनेत्रींना हिंदीत कामवाल्या बाईचं काम मिळतं. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम वणिता खरात 'कबीर सिंग' चित्रपटात कामवाल्या बाईच्या भूमिकेत झळकली होती. तसंच अभिनेत्री तृप्ती खामकरने 'गोविंदा नाम मेरा' चित्रपटात कामवाल्या बाईची भूमिका साकारली होती. पण, मराठी अभिनेत्रींना हिंदीत कामावल्या बाईचं काम का मिळतं? यामागचं सत्य तृप्ती खामकरने सांगितलं. अभिनेत्री तृप्ती खामकरने नुकतीच 'सर्व काही' या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. यावेळी गप्पा मारताना तृप्तीने मराठी अभिनेत्रींना हिंदीत कामवाल्या बाईचं काम का दिलं जातं? याविषयी सांगितलं. तृप्ती सर्वात आधी म्हणाली, ""कबीर सिंग' चित्रपटातील जी जाडी बाई धावते, ती मी नाही. मी 'कबीर सिंग' चित्रपटासाठी ऑडिशन दिलं होतं. पण, त्यात एक जाड बाई झाडू घेऊन धावते एवढंच काम होतं." यावर मुलाखदार म्हणाल्या, "पण तू आता कुठे कामवाल्या बाईचं काम करते?" तेव्हा तृप्ती म्हणाली, "आता ना...पण मी किती वर्ष तेच काम केलंय म्हणजे अर्बन कंपनीची कामवाली बाई, धर्मा फिल्म्सची कामवाली बाई...मी कुठली कुठली कामवाली बाई केली म्हणजे सगळीकडे." त्यावर मुलाखदार म्हणाल्या, "हल्ली मी असं बघितलं की, जे मराठीतील नवोदित आणि मध्यमवयीन अभिनेत्री असतात, त्यांना बरीच कामवाल्या बाईची कामं का मिळतात?" यावेळेस तृप्ती खामकरने पडद्यामागचं सत्य सांगितलं. अभिनेत्री तृप्ती खामकर म्हणाली, "मुळात कारण ते अनफॉर्च्युनेट टाइपकास्ट आहे. तुम्ही मराठी आहात, तुम्हाला मराठी बोलता येत. तुम्ही मराठी एक्सेंटमध्ये हिंदी बोलू शकता आणि जाड असला तर मग बाईचं...म्हणजे मी वेस्टन कपडे घालून ऑडिशनला जाते तेव्हा वाव कितनी अच्छी दिख रही है तू...साडी आणली आहेस का?... असं विचारतात आणि विचारायचे."

# अगोदर 'विजय ते विजया'साठी लढली, आता राज्याची पहिली 'ट्रांसजेंडर वनरक्षक'!



समाजातील ज्या घटकाचा आवाज आजवर कोंडला गेला, ज्यांना आजही समाज स्वीकारत नाही अशा 'एलजीबीटी' समूहाच्या म्हणजेच तृतीयपंथी समाजाच्या व्यथा आणि यशोगाथा आजवर आपण ऐकल्या असतील, पाहिल्या असतील.

मात्र विजया वसावेच्या वाट्याला आलेल्या जगण्याची, संघर्षाची आणि अस्तित्वाची कहाणी अंगावर काटा आणणारी आहे. इथल्या समाज व्यवस्थेमुळे पार खचून गेलेल्या विजयाने अनेकदा आत्महत्येचे प्रयत्न केले... संघर्षाच्या प्रत्येक टप्प्यावर तिला ठेच लागली, मात्र अखेरपर्यंत ती लढत राहिली... इतक्या वर्षाच्या खडतर जगण्यानंतर आज मात्र विजयाला स्वत:ची ओळख मिळाली आहे.

होय, नंदूरबारच्या अतिदुर्गम सातपुडा भागातील आदिवासी समाजाची विजया वसावे ही महाराष्ट्रातली पहिली पारलिंगी (तृतीयपंथी) वनरक्षक बनलीये. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने अधिकृत प्रमाणपत्र दिलेली विजया ही नंदुरबार जिल्ह्यातील पाहिली ट्रान्सजेंडर आहे. वनरक्षक पदासाठी जून २०२३ मध्ये विजयाने लेखी परीक्षा दिली होती. यानंतरच्या शारीरिक क्षमता चाचणीत तिने यश प्राप्त केले होते. या सर्व प्रक्रियेत अव्वल स्थान प्राप्त केल्यानंतर तिची वनरक्षक म्हणून वर्णी लागली आहे. तळोदा मेवासी विभागांतर्गत विजया वसावे हिची काठी वनक्षेत्रातील भगदरी गावात वनरक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे. तिच्या या यशाचे जिल्ह्यात कौतुक करण्यात येत आहे.विजया वसावे या यशाबद्दल प्रचंड आनंदी आहेत. त्या म्हणतात की, या यशाचा आनंद नक्कीच आहे; पण जीवनात एवढा संघर्ष करावा लागेल असे कधी वाटले नाही. ट्रान्सजेंडरलादेखील मानव म्हणून जे हक्क आहेत ते नाकारले जातात. समाजाने बदल स्वीकारणे अपेक्षित आहे; परंतु बऱ्याचवेळा तसे होत नाही. यशाची मालिका येथून पुढेही सुरू राहणार आहे.

पुण्यातील कर्वे इन्स्टिट्यूट मधून समाजकार्य महाविद्यालयातून एम.एस.डब्ल्यू ची पदवी संपादित केल्यानंतर विजयाने एका सामाजिक संस्थेत कामाला सुरुवात केली. याठिकाणी काम करताना तिने स्वतःच्या पायावर उभे राहण्याची धडपड सुरु केली होती. वनरक्षक पदासाठी जून २०२३ मध्ये विजयाने अर्ज केला होता. पदासाठी आवश्यक शारीरिक चाचणीसाठी दररोज सकाळी ५ वाजता उठून धावण्याचा सराव करत होती. यादरम्यान तीनवेळा रस्त्यावर पडून जखमा झाल्या. परंतू यानंतरही सराव न सोडता, चिकाटीने परीक्षा दिली. विजया वसावेचा शाळेपासून वनसंरक्षक होण्यापर्यंतचा प्रवास हा सोपा नव्हता, परंतू त्यापेक्षा अधिक संघर्ष हा 'विजय पासून विजया' बनण्यासाठी करावा लागला. नंदूरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुआ तालुक्यातील दहेल या छोट्याशा पाड्यावर विजय एका शेतकरी कुटुंबात जन्माला आला होता.

समाजातील ज्या घटकाचा आवाज आजवर कोंडला गेला, ज्यांना आजही समाज स्वीकारत नाही अशा 'एलजीबीटी' समूहाच्या म्हणजेच तृतीयपंथी समाजाच्या व्यथा आणि यशोगाथा आजवर आपण ऐकल्या असतील, पाहिल्या असतील.

मात्र विजया वसावेच्या वाट्याला आलेल्या जगण्याची, संघर्षाची आणि अस्तित्वाची कहाणी अंगावर काटा आणणारी आहे. इथल्या समाज व्यवस्थेमुळे पार खचून गेलेल्या विजयाने अनेकदा आत्महत्येचे प्रयत्न केले... संघर्षाच्या प्रत्येक टप्प्यावर तिला ठेच लागली, मात्र अखेरपर्यंत ती लढत राहिली... इतक्या वर्षाच्या खडतर जगण्यानंतर आज मात्र विजयाला स्वत:ची ओळख मिळाली आहे.

होय, नंदूरबारच्या अतिदुर्गम सातपुडा भागातील आदिवासी समाजाची विजया वसावे ही महाराष्ट्रातली पहिली पारलिंगी (तृतीयपंथी) वनरक्षक बनलीये. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने अधिकृत प्रमाणपत्र दिलेली विजया ही नंदुरबार जिल्ह्यातील पाहिली ट्रान्सजेंडर आहे. वनरक्षक पदासाठी जून २०२३ मध्ये विजयाने लेखी परीक्षा दिली होती. यानंतरच्या शारीरिक क्षमता चाचणीत तिने यश प्राप्त केले होते. या सर्व प्रक्रियेत अव्वल स्थान प्राप्त केल्यानंतर तिची वनरक्षक म्हणून वर्णी लागली आहे. तळोदा मेवासी विभागांतर्गत विजया वसावे हिची काठी वनक्षेत्रातील भगदरी गावात वनरक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे. तिच्या या यशाचे जिल्ह्यात कौतुक करण्यात येत आहे.विजया वसावे या यशाबद्दल प्रचंड आनंदी आहेत. त्या म्हणतात की, या यशाचा आनंद नक्कीच आहे; पण जीवनात एवढा संघर्ष करावा लागेल असे कधी वाटले नाही. ट्रान्सजेंडरलादेखील मानव म्हणून जे हक्क आहेत ते नाकारले जातात. समाजाने बदल स्वीकारणे अपेक्षित आहे; परंतु बऱ्याचवेळा तसे होत नाही. यशाची मालिका येथून पुढेही सुरू राहणार आहे.

पुण्यातील कर्वे इन्स्टिट्यूट मधून समाजकार्य महाविद्यालयातून एम.एस.डब्ल्यू ची पदवी संपादित केल्यानंतर विजयाने एका सामाजिक संस्थेत कामाला सुरुवात केली. याठिकाणी काम करताना तिने स्वतःच्या पायावर उभे राहण्याची धडपड सुरु केली होती. वनरक्षक पदासाठी जून २०२३ मध्ये विजयाने अर्ज केला होता. पदासाठी आवश्यक शारीरिक चाचणीसाठी दररोज सकाळी ५ वाजता उठून धावण्याचा सराव करत होती. यादरम्यान तीनवेळा रस्त्यावर पडून जखमा झाल्या. परंतू यानंतरही सराव न सोडता, चिकाटीने परीक्षा दिली. विजया वसावेचा शाळेपासून वनसंरक्षक होण्यापर्यंतचा प्रवास हा सोपा नव्हता, परंतू त्यापेक्षा अधिक संघर्ष हा 'विजय पासून विजया' बनण्यासाठी करावा लागला. नंदूरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुआ तालुक्यातील दहेल या छोट्याशा पाड्यावर विजय एका शेतकरी कुटुंबात जन्माला आला होता.

बालपणीच आईचे छत्र हरवले होते.

विजयला शाळेमध्ये असताना मुलांबरोबर राहणं कधीच आवडलं नाही. मुलाच्या शरीरामध्ये आपण अडकलो आहोत, घुसमटतो आहोत, अशी काहीशी त्याची तेव्हा भावना होती.

''माझ्यातल्या भावना या मुलीसारख्या आहेत. मी कोण आहे मला समजत नाही. मुली राहतात तसं राहण्याची इच्छा सतत वाटायची.'' असा प्रश्न विजय लहानपणी स्वत:ला विचारायची. थंडीच्या दिवसांमध्ये विजय तिचं 'बाईपण' जगून घ्यायची. कारण थंडीमध्ये शाळेत शॉल आणता येत होती आणि शाळेच्या वर्गामध्ये मुली कशा डोक्यावर ओढणी घेतात किंवा बायका कशा डोक्यावर पदर घेतात तसा विजय डोक्यावर शॉल घेऊन वर्गात बसायचा. त्याच्या अशा वागण्यामुळे वर्गातली मुलंही त्याला चिडवायची.

विजयने कधी शिक्षकांकडे जाऊन तक्रार केली तर तू मुलीसारखं का वागतो म्हणून शिक्षकच त्याला बोलायचे. विजयच्या भावना या मुलीसारख्या असल्याकारणाने त्याला मुलांमध्ये राहणं आवडत नसे. त्यामुळे हॉस्टेलमध्ये असताना देखील तो इतर मुलांसमोर अंघोळ करायचा नाही. त्यांच्यासमोर कपडे बदलायचा नाही. म्हणून कित्येकदा विजय हा रात्री उशिरा सगळे झोपल्यानंतर आंघोळ करायचा.

तिथल्याच जिल्हा परिषदेच्या शाळेमधून प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर विजय आदिवासी मुलांसाठीच्या आश्रमशाळेत दाखल झाला. परंतु आश्रमशाळेत दाखल झाल्यानंतर परिस्थिती एकदमच उलट झाली, प्रतिकूल झाली. अचानकपणे तो या शाळकरी मुलांच्या चेष्टेचा, टिंगलटवाळीचा प्रसंगी अत्याचाराचाही विषय ठरला.

पराकोटीच्या हेटाळणीच्या, गुंडगिरीच्या वागणूकीने विजयला नैराश्याच्या खाईत लोटले. याच नैराश्यामुळे जगण्याची उमेदच हरवून बसलेल्या विजयने अनेकदा आपले जीवन संपवण्याचा प्रयत्नही केला. अनेकदा विजय रात्री झोपताना जीवन संपवण्याचा एक मार्ग म्हणून डेटॉलची बाटली सोबत घेऊनच झोपत असे. पदवीशिक्षणासाठी विजय नाशिकला आला तरीही त्याच्यामागचा छळ आणि एकाकीपणा काही संपला नाही.

नाशिक मध्ये पदवीचं शिक्षण घेत असताना विजय एका डॉक्टर कडे गेला आणि मला बाईपणाचा भावना येत आहेत हे नेमकं काय? तेव्हा डॉक्टरने विजयला सहा ते सात महिन्यांच्या गोळ्या दिल्या आणि या गोळ्या घेतल्याने तुझ्यातील बाईपण निघून जाईल आणि पुरुषांसारखा वागायला लागेल असा सल्लाही दिला. सहा-सात महिन्यानंतरही काहीही फरक न पडल्याने डॉक्टर विजयच्या घरच्यांशी बोलले आणि त्यांनी विजयची मानसिक आणि शारिरीक स्थिती पालकांना समजावून सांगितली. तिथून पुढे मग भोंदू बाबा, मांत्रिक, नवस वगैरे गोष्टी विजयच्या वाट्याला आल्या. विजयच्या काकाचा मुलगा हा पुण्यामध्ये शिकण्यासाठी गेला होता. त्याच्या पाठोपाठ विजय पुण्यात उच्च शिक्षणासाठी पोहचला. विजयने पुण्यामध्ये ''MSW' ला प्रवेश घेतला. विजय ज्या महाविद्यालयामध्ये पदवीचे शिक्षण घेत होता त्या महाविद्यालयाने एलजीबीटीआयएक्यू संदर्भात एक कार्यशाळा आयोजित केली होती. पुण्याचे कार्यकर्ते बिंदुमाधव खिरे आणि मानसोपचारतज्ञ यांनी या कार्यशाळेला हजेरी लावली होती. ही कार्यशाळा विजयच्या आयुष्याला कलाटणी देऊन गेली आणि त्यादिवशी विजयला स्वत:ची ओळख पटली.

विजया म्हणते, की "त्या क्षणापर्यंत मला हे ठाऊक नव्हतं की स्त्री किंवा पुरूष असण्याइतकंच तृतीयपंथी असणं हेदेखील तितकंच नैसर्गिक असतं. कार्यशाळेत दाखल होईपर्यंत मी सामान्यांसारखा नाही, अशीच माझी भावना होती. परंतु या कार्यशाळेने माझा हा समज खोडून काढला. मीही इतरांप्रमाणेच सामान्य आहे, हे लक्षात आलं"

पदवी घेतल्यानंतर विजयाने कर्वे इन्स्टिट्यूटमधे त्याच वर्षी एका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. त्याचबरोबर विजयाने लिंगबदलाची शस्त्रक्रियाही करून घेतली. "आता मी सातपुडा प्रदेशातली पहिली तृतीयपंथीय आहे. एवढंच नाही तर नंदूरबार जिल्ह्यात तृतीयपंथीय ओळखपत्र मिळवणारीही पहिलीच आहे. 'मी कोण आहे', या प्रश्नाचं उत्तर तर मला मिळालंच शिवाय मला जे हवं होतं ते शस्त्रक्रियेद्वारे मी मिळवलंदेखील. तसंच मला आता माझी स्वतंत्र ओळख असलेलं ओळखपत्रही मिळालं आहे. माझ्या आयुष्यातल्या इतक्या उलथापालथींनंतर, संक्रमणानंतर, संघर्षानंतर मला खूपच शांत आणि हलकं वाटतं आहे." असं विजया म्हणते.

## दिनविशेष

**घटना**

२०१२: बराक ओबामा आणि जो बिडेन यांची दुसऱ्यांदा अनुक्रमे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली.

२००१: संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे (DRDO) महासंचालक डॉ. वासुदेव अत्रे यांना प्रतिष्ठेचा वाय. नायडुम्मा स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

१९९९: विकसनशील देशांना जैवतंत्रज्ञानाचा लाभ उपलब्ध करुन दिल्याबद्दल भारताचे वैज्ञानिक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना युनेस्को गांधी सुवर्णपदक जाहीर.

१९९६: अर्जेंटिनाचे गांधी म्हणून ओळखले जाणारे प्रा. अडोल्फो डी. ओबिएता यांना पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते जमनालाल बजाज आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान.

१९५४ : मुंबई राज्यात मुंबई वीज मंडळ या दिवशी स्थापन करण्यात आले.

**जन्म**

१९६८ : यारी यांग - याहूचे संस्थापक

१९२६ : झिगझॅगलर - अमेरिकन लेखक (निधन: २८ नोव्हेंबर २०१२ )

१९१५ : दिनकर द. पाटील चित्रपट दिग्दर्शक, पटकथा व संवाद लेखक (निधन: २१ मार्च २००५)

१९०१ : श्री. के. क्षीरसागर जेष्ठ टीकाकार, समीक्षक विचारवंत (निधन: २९ एप्रिल १९८०)

१८९० : बळवंत गणेश खापर्डे - कविभूषण

१८८० : यो सुका अकावा - निसान मोटर कंपनीचे संस्थापक (निधन: १३ फेब्रुवारी १९६७)

१८६१: जेम्स नास्मिथ - बास्केटबॉल खेळाचे निर्माते (निधन: २८ नोव्हेंबर १९३९)

**मृत्यू**

२०१३ : तरला दलाल - (जन्म: ३_जून १९३६)

२०१०: सिद्धार्थ शंकर रे - पश्चिम बंगालचे ६वे मुख्यमंत्री (जन्म: २० ऑक्टोबर १९२०)

२००२ : वसंत कृष्ण वैद्य स्वतःच्या सुवाच्च अक्षरात हिंदीत राज्यघटना लिहिणारे

१९९८ : अनंतराव कुलकर्णी - कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे संस्थापक (जन्म: १९ सप्टेंबर १९१७)

१९९२: जयराम शिलेदार - गंधर्व भूषण (जन्म: ६ डिसेंबर १९१६)

१९८७ : भालबा केळकर नाट्य लेखक व अभिनेते (जन्म: २३ सप्टेंबर १९२०)

१९८५ : संजीवकुमार - प्रसिद्ध अभिनेते (जन्म: ९ जुलै १९३८)

## राशी भविष्य

**मेष** - चांगल्या सुदृढ आरोग्यासाठी लांबवर चालत जा. आणखी पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा. कुणीतरी तुम्हाला त्रास देण्यास कारणीभूत ठरेल - तुमच्या विरोधात काही शक्ती कार्यरत झाल्या आहेत

**वृषभ** - तुम्ही बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल. या प्रक्रियेत तुम्ही विनाकारण मानसिक त्रास करून घ्याल. सदोदित तुमच्यातील लहान मूल कार्यरत ठेवण्याची तुमची क्षमता गमावून बसलात हे तुमच्या चिंतेचे मुख्य कारण ठरेल.

**मिथुन** - चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. जीवनाच्या वाईट कामात पैसा तुमच्या कामी येईल म्हणून, आज पासूनच आपल्या पैश्याची बचत करण्याचा विचार करा अथवा तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**कर्क** - आरोग्य एकदम चोख असेल. जे लोक आतापर्यंत पैश्याचा विचार न करता खर्च करत होते त्यांना आज पैश्याची अधिक आवश्यकता पडू शकते आणि आज तुम्हाला समजेल की, पैश्याची आपल्या जीवनात काय किंमत असते.

**सिंह** - अनेक चिंतांनी ग्रासल्यमुळे तुमची प्रतिकारक्षमता घटेल आणि विचारशक्ती कुंठेल. सकारात्मक विचारसरणी बाळगून या आजाराशी सामना करण्यासाठी स्वत:ला उत्तेजन द्या.

**कन्या** - आपल्या भांडकुदळ स्वभावावर नियंत्रण ठेवा, अन्यथा आपल्या नातेसंबंधाना धक्का बसू शकतो. खुल्या मनाने विचार करणे आणि कोणाही बद्दलचे पूर्वग्रह सोडून देण्याने आपल्या या स्वभावावर मात करू शकता.

**तूळ** - जेवणात मीठाची गरज ही अपिरहार्य असते, आपल्याला आनंदाची, सुखाची खरी किंमत कळण्यासाठी दुखाची गरज भासतेच. धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते.

**वृश्चिक** - आशावादी रहा आणि चांगल्या उजळ बाजूकडे लक्ष द्या. आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळाल्यामुळे आपल्या आशा आकांक्षा आणि स्वप्ने प्रत्यक्षात येतील.

**धनु** - आज तुम्हाला तुमचे आरोग्य राखण्यासाठी आणि चांगेल दिसावे यासाठी प्रयत्न करायला खूप भरपूर मोकळा वेळ मिळेल. तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे.

**मकर** - मुलं तुमच्या आवडीनुसार वागणार नाहीत, त्यामुळे तुम्ही उद्विग्न व्हाल. तुमचा अनियंत्रित राग सर्वांना त्रासदायक ठरु शकतो. कोपिष्ट व्यक्तीची ऊर्जा वाया जाते आणि निर्णय क्षमतेला खीळ घालते.

**कुंभ** - तुमच्या पुढे जाण्यासाठी कुणीतरी तुमचा मूड बिघडविण्याचा प्रयत्न करेल परंतु तुम्हाला त्रास देण्याचा हा प्रयत्न तुम्ही यशस्वी होऊ देऊ नका. या सगळ्या फुकाच्या चिंता आणि काळज्या यामुळे तुमच्या शरीरावर विपरीत परिणाम होऊ शकतो आणि कदाचित त्वचाविषयक समस्या उद्भवेल.

**मीन** - इतरांविषयी शेरेबाजी करताना किंवा गृहितके ठरविताना त्यांच्या भावना समजून घ्या. तुमच्याकडून घेतलेला एखादा चुकीचा निर्णय संबंधितांवर विपरीत परिणाम करण्याबरोबरच तुम्हाला मानसिक तणावात टाकणारा ठरेल.

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला तब्बल ११०० नारळांचा महानैवेद्य



**पुणे (अभिजित येरल्लू) :** गाणपत्य संप्रदायामध्ये कार्तिक शुद्ध चतुर्थीनिमित्त श्री उमांगमलज जन्मोत्सवात तब्बल ११०० नारळांचा महानैवेद्य दाखवून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची मंगळवारी पूजा बांधण्यात आली. 'श्रीफला'मध्ये सजलेल्या गणरायाचे रूप डोळ्यांमध्ये साठवून घेण्याबरोबरच भाविकांनी मोबाईलमध्ये गजाननाचे छायाचित्र टिपले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती मंदिरात श्री उमांगमलज जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नारळांची आरास करण्यात आली. पहाटे तीन वाजता ब्रह्मणस्पती सूक्तपठण झाले. रसिक कुलकर्णी आणि सानिका कुलकर्णी यांनी स्वरपूजा बांधली.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, 'देवी पार्वतीने अंगावरच्या मळापासून एक पुतळा बनवला. त्याला जिवंत केले. पुढे त्याचे आणि शंकरांचे युद्ध झाले. भगवान शंकरांनी त्या मुलाचे मस्तक उडविले. देवी पार्वतीच्या संतापाला शांत करण्यासाठी शेवटी त्या बालकाच्या धडावर भगवान श्री विष्णूंनी आणलेले गज मस्तक बसविण्यात आले आणि त्यालाच श्री गजानन असे म्हटले आहे. ही श्री गणेश जन्माची कथा आपण नेहमी ऐकतो ती या अवताराची कथा आहे. या अवतारात उमांगमलज हे गणेशाचे नाव आहे. आपली बुद्धी हीच पार्वती देवी आहे. तिच्यावर चढलेला अहंकार आणि ममत्वाचा थर हाच मळ आहे.

हा अहंकार आणि ममत्व दूर झाले की ज्या मोरयांची प्राप्ती होते त्यांना उमांगमलज असे म्हणतात.'


# माजी आमदार राजू पारवेंचे पक्षबदल, लोकसभेत शिवसेनेत, विधानसभेत भाजपमध्ये !



**नागपूर (नितीन देवळेकर) :** विधानसभा निवडणुकीत उमरेड मतदार संघातून माघार घेतल्यानंतर माजी आमदार राजू पारवे यांनी मंगळवारी दुपारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. सुरुवातील काँग्रेसमध्ये, त्यानंतर लोकसभा निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेत आणि आता विधानसभा निवडणुकीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

राजू पारवे मुळचे कॉंग्रेसचे. या पक्षाकडून ते २०१९ मध्ये उमरेडचे आमदार म्हणून निवडून आले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पूर्वीज्ञकाँग्रेसचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षाकडून ते रामटेक लोकसभा निवडणूक लढले.

त्यात त्यांचा पराभव झाल्यानंतर सेनेकडून उमरेड विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळेल, या अपेक्षेने त्यांनी पक्षाकडे अर्ज केला होता. मात्र या मतदार संघातून भाजपने माजी आमदार सुधीर पारवे यांची शेवटच्या क्षणी यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे राजू पारवे यांनी सुधीर पारवे यांचा पाठिंबा जाहीर करुन निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे त्यांची अवस्था तेलही गेले अन् तुपही अशी झाली होती. पुढे ते काय करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी प्रचार मिरवणुकीच्या निमित्ताने नागपूरला आले होते. प्रचार मिरवणूक संपल्यानंतर मुंबईला निघत असताना राजू पारवे धरमपेठेतील फडणवीस यांच्या निवास्थानी १० ते १२ समर्थकांसह पोहचले. फडणवीस यांना मुंबईला जायचे असल्यामुळे त्यांनी पारवे यांच्या गळयात भाजपचा दुपट्टा घालत पक्षात प्रवेश करुन घेतला आणि त्यांचे स्वागत केले. भाजपच्या ग्रामीण पदाधिकाऱ्यांना या पक्ष प्रवेशाची माहिती नसल्यामुळे सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उमरेड राखीव मतदारसंघातून राजू पारवे कॉंग्रेसचे उमेदवार होते व त्यांनी भाजपचे सुधीर पारवे यांना पराभूत करून ही जागा दहा वर्षांनंतर पुन्हा काँग्रेसकडे खेचून आणली होती. लोकसभा निवडणुकीपूर्वी ते रामटेक लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून लढणार अशी चर्चा होती. तशी तयारीही राजू पारवे यांनी सुरू केली होती. पण ऐनवेळी ही जागा भाजपऐवजी शिंदे गटाला गेली. त्यामुळे राजू पारवे यांनी काँग्रेसचा त्याग करून शिंदे सेनेत प्रवेश केला पण त्यात ते पराभूत झाले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत उमरेडची जागा शिंदे गटासाठी सोडली जाईल व तेथून पुन्हा त्यांना उमेदवारी दिली जाईल, अशी चर्चा होती. महायुतीत या जागेवरचा उमेदवारही शेवटच्या दिवसापर्यंत जाहीर केला नव्हता. अखेर अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सकाळी भाजपने या जागेवर सुधीर पारवे यांना उमेदवारी देण्याची घोषणा केली.



## काँग्रेसच्या मधुरिमाराजे छत्रपती यांचा कोल्हापुरातून अर्ज मागे

**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण) :** आधीपासून उमेदवारीवरून गाजत असलेल्या कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती यांनी निवडणुकीतून माघार घेतली. तर उमेदवारी नाकारलेले राजेश लाटकर यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने गोंधळात भर पडली आहे.या मतदरसंघात काँग्रेस अंतर्गत मोठी चुरस निर्माण झाली होती. आधी राजेश लाटकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्याला विरोध झाल्यावर २४ तास उलटण्याच्या आत मधुरिमाराजे छत्रपती यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. परंतु आज अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दहा मिनिटांत खासदार शाहू महाराज, युवराज मालोजीराजे छत्रपती व मधुरिमाराजे छत्रपती या जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचल्या.

# फडणवीस, बावनकुळे, केदार, देशमुखांसह २१७ रिंगणात

**नागपूर, (विशाल पाटील ) :** महाराष्ट्राच्या राजकारणात कधी नव्हे ते अधिक महत्त्व २०१४ मध्ये फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर आले. नागपूर हे राज्याचे केंद्रबिंदूच ठरले. अशा जिल्ह्यातील सर्वच निवडणुकीकडे प्रत्येक घटकांचे लक्ष असणे स्वाभाविकच. त्यात विधानसभा निवडणुका म्हंटल्यावर रिंगणातील उमेदवारांची चर्चा अधिक होते. नागपूर शहरात व जिल्ह्यात प्रत्येक सहा या प्रमाणे १२ मतदारसंघ आहेत. त्यात तब्बल २१७ उमेदवार रिंगणात आहेत.



निवडणूक लढवणा-यांमध्ये भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री नितीन राऊत, विद्यमान आमदार विकास ठाकरे यांचा समावेश आहे.माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील काटोल मधून व माजी मंत्री सुनील केदार यांच्या पत्नी अनुजा या सावनेरमधून निवडणूक लढवत असल्याने देशमुख व केदार यांची प्रतिष्ठापणाला लागली आहे.

नागपूर जिल्ह्यात अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी नागपूर जिल्ह्यातील एकूण १२ विधानसभा मतदारसंघातील ७२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता सर्व मतदारसंघ मिळून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या २१७ इतकी असल्याचे निवडणूक विभागाने कळवले आहे.

काटोल मतदारसंघात २२ अर्ज आले होते. पाच जणांनी अर्ज मागे घेतले असून १७ उमेदवार मैदानात आहेत. सावनेरमध्ये २१ अर्ज आले होते. ३ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून आता १८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. हिंगण्यात २६ अर्ज दाखल झाले होते. ८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून आता १८ उमेदवार रिंगणात आहेत. उमरेडमध्ये २२ अर्ज दाखल झाले.११ उमेदवारांनी माघार घेतली. ११ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघात १३ उमेदवारांनी अर्ज भरले होते.

# मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात येणाऱ्या वाहनात घबाड

**धुळे (सचिन कदम) :** मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात येणाऱ्या संशयास्पद मोटारीच्या तपासणीत पोलिसांना ७० लाख रुपयांची रोकड मिळाली. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात महामार्गावर ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, पोलीस उपअधीक्षक सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांनी त्यांच्या पथकाच्या माध्यमातून ही कारवाई केली. विधानसभा निवडणुकीमुळे भरारी पथकांकडून महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवर गस्त वाढविण्यासह वाहनांची तपासणी सुरु आहे. या तपासणी मोहिमेत शिरपूर तालुका पोलीस ठाण्याच्या




हद्दीत मोठी कारवाई झाली. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गाने मध्य प्रदेशातील सेंधव्याकडून शिरपूरकडे येणाऱ्या एका मोटारीतून लाखोंची रोकड महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर खात्री झाल्यानंतर पोलिसांनी संशयित मोटार शिरपूर तालुक्यातील पाटील ढाब्यासमोरील गतिरोधकावर थांबवली. मोटार पोलीस ठाण्यात आणली असता मोटारीत रोकड असल्याची खात्री झाली. यानंतर निवडणूक आयोगाच्या अधिपत्याखालील पथकाला पाचारण करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीत मोटारीतील डिकीत ठेवलेल्या ७० लाख रुपयांची मोजदाद करण्यात आली. ही रक्कम जप्त करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी संदीप पवार (३३), तुषार साळुंखे (३२) दोघे रा. मोगलाई, साक्री रोड, धुळे, विजय कुलकर्णी (३७, शहादा, नंदुरबार) या तिघांना ताब्यात घेतले.

## SPORT

# India women's team's full 2025-2029 cricket schedule announced



The India women's team's Future Tours Program (FTP) for the next cycle, from 2025 to 2029, was unveiled by the International Cricket Council (ICC) on Monday (November 4). The governing body of the game announced the full FTP cycle for the 2025-2029 phase.One of the biggest developments is the addition of a new team in the ICC Women's Championship. While 10 teams participated in the current cycle, the number will increase to 11 after the addition of Zimbabwe. The ICC stated that the decision to add Zimbabwe is a 'significant step toward broader global representation in women's cricket'. In the new cycle of the Women's Championship, each team will be playing four home and four away series. There will be a total of 44 series in the new FTP cycle. With each series containing three matches, a total of 132 ODIs will be played in the upcoming championship. The Championship will conclude with the 2029 Cricket World Cup. The ICC has also announced that the new FTP cycle will have an ICC event every year. The teams will be competing in the Women's Cricket World Cup in 2025. In 2026, there is the Women's T20 World Cup followed by the Champions Trophy and T20 World Cup in 2027 and 2028 respectively. FTP cycle for India women's team: India women's team's FTP cycle will get underway in January 2025 and run until December 2028 before the 2029 ODI World Cup. The Harmanpreet Kaur-led side is set to play five Tests, 36 ODIs, and 30 T20Is in bilaterals during the new cycle. The team will also feature in three T20I tri-series in 2026, 2027, and 2028 along with competing in ICC events. In its first series of the new FTP cycle, the India women's team will be facing Ireland at home in a three-match ODI series. In July, the team will be visiting England for 3 T20Is and as many ODIs. It will be followed by a three-match ODI series against Australia at home before the team competes in the ODI World Cup. In December 2025, the India women's team will host Bangladesh for 3 ODIs and as many T20Is.

# uvraj Singh tries to awaken Virat Kohli's inner beast on his birthday: 'You've done it in the past, you'll do it again'

Virat Kohli turned 36 on Tuesday and his longtime former India teammate Yuvraj Singh led the way in wishing the former captain on his birthday. Kohli and India may be going through a rough patch at the moment but the fact remains that he is one of the faces of the sport in the country. The keyword "Virat Kohli" was a top trend on Google on Tuesday as fans flooded the internet with wishes to celebrate his birthday. There were over 50,000 searches, with searches



peaking shortly after midnight. Other related keywords that people Googled included "Virat birthday", "Virat Kohli birthday photos" and "Anushka Sharma". Yuvraj was among the seniors in the Indian team when Kohli made his international debut in an ODI against Sri Lanka in August 2008. He went on to play 11 ODIs and three T20Is under Kohli's captaincy in 2017. "Wishing you a very Happy Birthday #KingKohli! The greatest comebacks emerge from our setbacks and the world eagerly looks forward to your solid comeback.

You've done it in the past and I'm sure you will do it yet again. God bless! lots of love @imVkohli," said Yuvraj in a post on his social media handles for Kohli.

# Indian Boxer Mandeep Jangra Wins WBF's Super Featherweight World Title



Indian professional boxer Mandeep Jangra won the World Boxing Federation's super featherweight world title after defeating Britain's Conor McIntosh in the Cayman Islands. The 31-year-old, who trains under former Olympic silver medallist Roy Jones Jr and has faced only one defeat in his professional career so far, had the upper hand in most rounds. He delivered powerful punches from the outset, maintaining his stamina throughout the 10 rounds, while the British boxer struggled to keep pace. Conor did try to make a comeback, but Jangra continued to maintain the upper hand in most rounds. "This is one of the biggest victories of my career. I am thankful to my sponsor Nash Built Construction, Chief Coach Roy Jones, Assistant Coach Asa Beard and Angel," Jangra said in a media release "I have worked hard for years to achieve this. It is a matter of pride for me that I could bring glory to the country." The Haryana boxer, who made his professional boxing debut in 2021, hopes the title will inspire more Indian pugilists to turn professional. "I think this title will open the way for other boxers of the country and they will also decide to make a career in professional boxing. "Our boxers are good and there is no dearth of talent in them. If they get good promoters and managers, they can also become world champions," Jangra added.

# Wasim Akram, Vaughan rub salt into Rohit's wounds after New Zealand hammering: 'Pakistan will beat India in Tests'





India's debacle at home against New Zealand made former cricketers believe that Pakistan have the best chance to topple their neighbours in red-ball cricket on turning tracks.

Former England Michael Vaughan and legendary Pakistan cricketer Wasim Akram gave Pakistan the upper hand based on current form if the two cricket giants square off in a Test series. Notably, India and Pakistan have stopped paying bilaterals for quite some time now. The last time the two sides played a series was way back in 2012-13. The last Test match between the two sides was in December 2007 in Bengaluru.

During a commentary session in the Australia vs Pakistan 1st ODI in Melbourne on Monday (November 4), Vaughan expressed his desire to see India and Pakistan face off in Test cricket, something that has eluded cricket fans for nearly 17 years now.

"I would want to see a Test series between India and Pakistan. Pakistan can now beat India on the turners," Vaughan said, pointing to the struggles of India's batters in tackling spin.

Akram said Pakistan will have the best chance to beat India on a spin-friendly track if a Test match between the two teams is played now. "It will be massive. It will be good for the game, for two cricket-crazy nations. Pakistan have a chance to beat India in Tests now on a spinning track. They have been hammered by New Zealand 3-0 at home," said the former Pakistan captain. After having a torrid time at home, Pakistan produced dry and barren tracks during the England series and got immediate results as spinner Sajid Khan and Noman Ali ripped through Bazball to help Pakistan win the series 2-1.

After winning a world record 18 Test series in a row in home conditions and staying unbeaten in a home Test match for more than 4000 days, India's fortress was breached and how by New Zealand. The Tom Latham-led side stunned Rohit Sharma's India by whitewashing them in the three-match Test series. This was the first time in the history of Test cricket in India that they were swept in a series involving a minimum of three Tests.

## दिवाळीनंतरही मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा नाहीच!

● मुंबई, विशाल कारंडे :



दिवाळीच्या दिवसांत झालेली फटाक्यांची आतषबाजी यामुळे मुंबईच्या हवेचा दर्जा पहिल्या दिवसापासून ढासळला होता. पहिल्याच दिवशी काही भागात अतिवाईट ते वाईट हवेची नोंद झाली. दरम्यान, दिवाळीनंतरही मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झालेली नाही. याउलट, सोमवारी मुंबईच्या हवेचा दर्जा मध्यम श्रेणीतच नोंदला गेला. सलग पाच दिवस शहरात हवेची गुणवत्ता खालावलेली आहे. त्यामुळे, अशुद्ध हवेचा मुंबईकरांना सामना करावा लागणार आहे. मागील काही दिवसांपासून मुंबईतील हवेची गुणवत्ता ढासळली असतानाच, दिवाळीच्या पहिल्याच दिवशी या हंगामातील हवा प्रदूषणाने उच्चांक गाठला. फटाक्यांचा धूर गुरुवारी सायंकाळपासून वाढल्याने मुंबईतील अनेक भागात धुरके पसरले होते. शिवडी, वांद्रे, कांदिवली या परिसरात अतिवाईट हवेची नोंद झाली होती.

# जम्मू-काश्मीर विधानसभेत गोंधळ

## सहा वर्षांनंतर भरलेल्या अधिवेशनाचा पहिलाच दिवस गाजला

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



जम्मू आणि काश्मीर विधानसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी, सोमवारी गोंधळाचे चित्र पाहायला मिळाले. पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीचे वाहीद पारा यांनी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे अनुच्छेद ३७० रद्द करण्याविरोधात आणि राज्याचा दर्जा परत मिळण्याची मागणी करणारा ठराव मांडला. त्यानंतर तब्बल सहा वर्षांनंतर अधिवेशन होत असताना सभागृहात गोंधळाची स्थिती होती.

सोमवारी अधिवेशन सुरू झाल्यानंतर नॅशनल कॉन्फरन्सचे ज्येष्ठ नेते अब्दुल राथर यांची सभागृहाच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यानंतर पुलवामाचे आमदार पारा यांनी तातडीने आपला ठराव मांडला.“जम्मू आणि काश्मीरच्या जनतेच्या भावना लक्षात घेऊन हे सभागृह जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा मागे घेण्याच्या निर्णयाचा विरोध करते,” असे या ठरावात नमूद करण्यात आले आहे. यानंतर भाजपच्या सर्व २८ आमदारांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. नायब राज्यपाल मनोज सिन्हा सभागृहाला संबोधित करतील असे राथर यांनी जाहीर केल्यानंतर भाजपचे सदस्य शांत झाले.

### राज्याच्या दर्जासाठी प्रयत्न करणार!

जम्मू आणि काश्मीरचे नवीन सरकार राज्याचा दर्जा परत मिळवण्यासाठी पूर्ण प्रयत्न करेल असे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी अभिभाषणात स्पष्ट केले. तसे झाल्यानंतर जनतेने लोकशाही संस्थांवर ठेवलेल्या विश्वासाची परिपूर्ती होईल. हे सरकार जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सज्ज आहे आणि जम्मू-काश्मीरचा राज्याचा दर्जा परत मिळावा ही जनतेची तीव्र इच्छा आहे, असे सिन्हा म्हणाले.ही विधानसभा जम्मू आणि काश्मीरच्या जनतेच्या भावनांचे प्रतिनिधित्व करते. सत्य हे आहे की ५ ऑगस्ट २०१९ रोजी घेण्यात आलेला निर्णय जनतेला रुचलेला नाही. आजचा ठराव हा निव्वळ प्रसिद्धीसाठी मांडला होता.

– ओमर अब्दुल्ला, मुख्यमंत्री, जम्मू-काश्मीर

## सिडकोच्या २६ हजार घरांच्या अर्जनोंदणीसाठी अखेरचे ७ दिवस

● नवी मुंबई, धनश्री सट्टा :



सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ६८ हजार इच्छुकांनी या महागृहनिर्माणात घर मिळावे यासाठी अर्जनोंदणी केली आहे. ११ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणीची अखेरची मुदत सिडकोने जाहीर केल्यामुळे अखेरचे सात दिवस इच्छुकांसाठी शिल्लक आहेत. म्हाडाने नूकत्याच काढलेल्या २ हजार घरांच्या सोडतीमध्ये तब्बल १ लाखांहून अधिक अर्जदारांनी सहभाग घेतला होता. मात्र सिडको महामंडळाने दस-याच्या मुहूर्तावर ‘माझे पसंतीचे सिडकोचे घर’ या २६ हजार घरांच्या जाहीर केलेल्या महागृहनिर्माण योजनेतील घरांच्या किंमती अजूनही जाहीर न केल्याने इच्छुकांमध्ये संभ्रम कायम आहे. पहिल्याच दिवशी या योजनेत २४ तासांतच १२,४०० ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे सर्वाधिक अर्जनोंदणी होईल अशी अपेक्षा सिडकोच्या पणन विभागाला होती. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) व अल्प उत्पन्न गटासाठी (एलआयजी) या दोन उत्पन्न गटात सिडकोचे संकेतस्थळ https:\. cidcohomes.com यावर हे अर्ज नोंदणी होत आहेत. नवी मुंबईच्या विविध उपनगरांमध्ये सिडको मंडळाने ६७ हजार घरांचे बांधकाम हाती घेतले आहे. याच घरांपैकी पहिल्या टप्प्यांतील २६ हजार घरे ग्राहकांना उपलब्ध केली आहेत.

# आतषबाजीत मुक्या प्राण्यांची फरपट, दिवाळीच्या चार दिवसांत ३१ प्राणी व पक्षी जखमी

● मुंबई, राकेश गायकवाड :



दिवाळीत फटाक्यांची आतषबाजी लहानथोरांना आनंद देते, मात्र त्यातून निघणाऱ्या धूर आणि आवाजाने जिथे माणसांनाही असह्य त्रास होतो, तिथे प्राणी-पक्षी अपवाद कसे ठरतील? दिवाळीच्या चार दिवसांत मुंबई आणि परिसरात फटाक्यांच्या धुराचा त्रास झाल्याने, भाजल्याने ३१ प्राणी जखमी झाले आहेत. यामध्ये आठ श्वानांचा तर २३ पक्ष्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे गतवर्षीच्या तुलनेत यंदा प्राणी व पक्षी जखमी होण्याच्या घटनेत काही प्रमाणात घट झाली आहे.

३१ ऑक्टोबरपासून दिवाळीला सुरुवात झाली. दिवाळीनिमित्त नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आले. फुलबाजा, भुईचक्र, सुतळी बार, रॉकेट असे विविध प्रकारचे फटाके फोडताना झालेल्या वायू प्रदूषणामुळे मुंबईतील हवेची गुणवत्ता प्रचंड खालावली. तसेच ध्वनी प्रदूषणाने अनेक नागरिकांना त्रास झाला आहे. या त्रासातून प्राणी आणि पक्षीसुद्धा सुटले नाहीत.

गेल्या चार दिवसांत मुंबईमध्ये ३१ प्राणी आणि पक्षी जखमी झाले आहेत. दिवाळीनिमित्त फोडण्यात आलेल्या फटाक्यांमुळे प्रचंड धूर निर्माण झाला. या धुरामुळे पक्ष्यांना श्वसनाचा त्रास होऊन त्यांना दुखापत झाली आहे. श्वसनाचा त्रास झाल्याने जखमी झालेल्यांमध्ये १५ कबुतरे, सहा घारी आणि दोन घुबड यांचा समावेश आहे. तसेच आठ श्वान जखमी झाले असून यातील अनेक श्वानांना श्वसनाचा त्रास झाला, तर काही श्वानांच्या पाठीवर फटाके फोडण्यात आले. त्या श्वानांना भाजलेल्या अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. या सर्व जखमी श्वान आणि पक्ष्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. किरकोळ जखमी झालेल्या पक्षी आणि श्वानांवर उपचार करून त्यांना सोडण्यात आले, तर गंभीर जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती परळ येथील ‘दी बाई साकरबाई दिनशॉ पेटिट हॉस्पिटल फॉर ॲनिमल’ रुग्णालयाचे (बैलघोडा रुग्णालय) व्यवस्थापक डॉ. मयूर डांगर यांनी दिली.

## कोल्हापुरात स्थिर सर्वेक्षण पथकाला आढळले साडेपाच कोटींचे दागिने



● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

स्थिर सर्वेक्षण पथकाला शिरोली जकात नाक्यावरील तपासणीत एका वाहनात ५ कोटी ५८ लाखांचे मौल्यवान दागिने कारवाईत आढळले. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघामध्ये स्थिर सर्वेक्षण पथाकडून शिरोली जकात नाका येथील तपासणी नाक्यावर ९०७ वाहने तपासण्यात आली. सायंकाळी ६ च्या दरम्यान रेडिअंट व्हॅल्युएबल लॉजिस्टिक लिमिटेड या कंपनीच्या वाहनाची तपासणी केली. या वाहनात ४ कोटी ३ लाख रुपये इतक्या किंमतीचे सोने, ११ लाख ५१ हजार रुपये किमतीची चांदी, तर १ कोटी ४४ लाख रुपये किमतीचे हिरे असे एकूण ५ कोटी ५८ लाख रुपये किंमतीचे दागिने आढळून आले.त्यातील कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता हे दागिने चंदुकाका सराफ ॲण्ड सन्स लिमिटेड यांचे असल्याचे सांगितले. कागदपत्रांची पडताळणी प्राप्तीकर विभाग व वस्तू व सेवा कर विभागामार्फत सुरु असून त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल) डॉ. संपत खिलारी यांनी सांगितले.

## मांडूळ सापावर औषधांचा प्रयोग, दुतोंड्या हा गैरसमज



● मुंबई, यश सावंत :

कफ परेड परिसरात सापळा रचून ताब्यात घेण्यात आलेल्या चौघांच्या टोळीकडे सापडलेल्या दुर्मीळ मांडूळ प्रजातीच्या सापावर औषधांचा प्रयोग केला गेल्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली. मांडूळ प्रजातीच्या सापाची विक्री करण्यात येणार असल्याची माहिती कफ परेड पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने सापळा रचला होता. संशयित वाहनाची तपासणी करण्यात आली असता मागील बाजूस ठेवलेल्या एका पिशवीत तपासणी करताना त्यात पाच किलो वजनाचा आणि ५५ इंच लांबीचा मांडूळ साप आढळून आला.

दरम्यान, बचाव केलेल्या मांडूळ सापाला वैद्यकीय उपचारांसाठी वनविभागाच्या मदतीने ‘रेस्क्यूइंक असोसिएशन फॉर वेल्फेअर’(रॉ) या स्वयंसेवी संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले. मांडूळ सापाला ताब्यात घेतले असता त्याच्या तोंडातून स्राव बाहेर पडत असल्याचे निदर्शनास आले. तसेच सापाला हाताळताना त्याचे वजन अधिक असल्याचे जाणवले. त्यामुळे सापाची तातडीने वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्या वेळी सापाचे वजन पाच किलो भरले.

# मराठीचा आग्रह करणाऱ्या प्रवाशाला डांबले, तिकीट तपासनीसाची दमदाटी

● वसई, सुचिता सोनावणे :



नालासोपारा रेल्वे स्थानकात एका प्रवाशाने तिकीट तपासनीसाला मराठी भाषेत बोलण्यास सांगिल्याने त्या प्रवाशालाच डांबून त्याच्याकडून माफिनामा लिहून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी मराठी एकीकरण समिती आक्रमक झाल्यानंतर संबंधित तिकीट तपासनिसला निलंबित करण्यात आले असून पश्चिम रेल्वेनेही याबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे.

रविवारी रात्री नऊच्या सुमारास एका मराठी भाषिक दांपत्याला नालासोपारा रेल्वे स्थानकात तिकिट तपासनीस रितेश मौर्या यांनी अडवून तिकिट विचारले. या दांपत्याने मोर्या यांना मराठीत बोला असे सांगितले.त्यावरून मोर्या यांना राग आला आणि शाब्दिक बाचाबाची झाली. मौर्या यांनी या दांपत्याला थेट पोलीस ठाण्यात नेले आणि त्यांना दमदाटी करून माफीनामा देऊन घेतला. या पुढे मराठीचा आग्रह केला तर कायदेशीर कारवाई करू, अशी धमकी प्रवाशाला देण्यात आली होती.

या प्रकाराची माहिती मराठी एकीकरण समितीला सोमवारी मिळाली. संतप्त झालेल्या एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी रात्री नालासोपारा स्थानकातिल स्टेशन मास्तर च्या कार्यालयाला घेराव घालत जाब विचारला.अशा प्रकारे प्रवाशांना दमदाटी करून मराठी भाषेचा अनादर करणे चुकीचे आणि संतापजनक असल्याचे समितीच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणून दिले. महाराष्ट्रात राहून मराठी भाषेचा तिरस्कार करणे चुकीचे आहे. अशा प्रकारे मराठी भाषेची गळचेपी खपवून घेणार नाही असे मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी सांगितले.

## हत्तीच्या केसांचे दागिने विकणाऱ्या पुण्यातील सराफाविरुद्ध गुन्हा, वन्यजीव कायद्यान्वये कारवाई

● पुणे, अभिजीत येरल्लू :



हत्तीच्या केसांपासून तयार करण्यात आलेले ब्रेसलेट्स, तसेच अंगठ्यांची विक्री केल्याच्या आरोपावरून विश्रामबाग पोलिसांनी शहरातील एका सराफ व्यावसायिकाविरुद्ध वन्यजीव कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. त्याच्या दुकानातून जप्त करण्यात आलेले दागिने पडताळणीसाठी वन विभागाच्या पथकाकडे सोपविण्यात आले आहेत. हत्तीचे केस बाळगणे, तसेच विक्री करणे हा वन्यजीव कायद्याने गुन्हा आहे. हत्तीच्या केसांचे दागिने बनवून त्याची विक्री केल्याच्या आरोपावरून कुमठेकर रस्त्यावरील व्ही. आर. घोडके सराफ या पेढीच्या मालकांविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका वन्यजीवप्रेमी सामाजिक कार्यकर्त्याने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हत्तीचे केस धारण केल्याने शक्ती आणि संरक्षण मिळते, अशी धारणा दक्षिणेकडील नागरिकांमध्ये आहे.

## ‘माझी लढत देवेंद्र फडणवीस यांच्याशीच’ या खासदारांच्या वक्तव्याने सर्वत्र चर्चा



● वर्धा, नितीन देवळेकर :

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज परत घेण्याची प्रक्रिया आटोपली आहे. आरोप प्रत्यारोप तसेच खुलासे सूरू झाले आहेत. सर्वाधिक लक्षवेधी चर्चा आजवर आर्वी मतदारसंघात भाजप उमेदवारीवरून झाली. आता काँग्रेस गोटात आरोप फेटाळून लावणे सूरू झाले आहे. खासदार अमर काळे यांनी पत्नी मयुरा काळे यांच्यासाठी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची उमेदवारी खेचून आणली. त्यावर त्यांना आरोपाच्या पिंजऱ्यात उभे केल्या जात आहे. त्यावर खासदार अमर काळे यांनी एका स्थानिक वृत्तवहिनी सोबत बोलतांना खुलासा केल्याचे दिसून आले आहे.

ते म्हणतात उमेदवार पत्नी मयुरा काळे यांनी कुठेच अर्ज केला नव्हता. पक्षानेच स्पष्ट केले की तुम्हालाच उभे रहावे लागेल. म्हणून माझा नाईलाज झाला. आमची लढत सुमित वानखेडे किंवा दादाराव केचे यांच्याशी नाही. लढत देवेंद्र फडणवीस यांच्याशी आहे. नॉट रिचेबल हा आरोप खोटा आहे. मी उपलब्ध असतोच. मात्र या निवडणुकीनंतर भेटीगाठी साठी दिवस ठरवू. तसे नियोजन करू, असा खुलासा त्यांनी केला.

घराणेशाहीच्या आरोपवर ते विचारतात की मग मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत काय म्हणाल? एक खरं की खासदार काळे हे आरोप फेटाळून लावतात. मात्र फडणवीस यांचे ओएसडी असा उल्लेख करीत ते थेट देवेंद्र फडणवीस यांच्याशी सामना असल्याचे दाखवून प्रसंग बाका असल्याचे दाखवून देत आहे. तसेच आम्ही कुणाशी लढलो, हे एक वाट मोकळी ठेवत असल्याचे आर्वीचे सुजाण सांगतात. कारण वानखेडे यांना फडणवीस यांच्या प्रभावातून आर्वी, कारंजा व आष्टी या मतदारसंघातील तीनही तालुक्यात अनेक कामे मार्गी लावण्यात यश आले.

# महायुतीला मतदान न करण्याची केली प्रतिज्ञा!

● पुणे, सुचिता देशमुख :



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) आठवले गटाने महायुतीला मतदान करणार नाही, असा निर्धार केला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना महायुतीकडून सन्मानपूर्वक वागणूक मिळत नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीने आरपीआय (आठवले) पक्षाला शहरातील एक जागा तरी सोडावी, अशी मागणी आरपीआय आठवले गटाच्या कार्यकर्त्यांनी महायुतीच्या नेत्यांकडे केली होती. आत्तापर्यंत भाजपचा मित्र पक्ष म्हणून प्रत्येक निवडणुकीत त्यांच्यासोबत राहिलेल्या आरपीआयला भाजपने सन्मानपूर्वक वागणूक दिली नाही. विधानसभा निवडणुकीत पुणे शहरातील तसेच जिल्ह्यातील एकही जागा महायुतीने आरपीआयच्या उमेदवाराला दिली नाही. याच्या निषेधार्थ आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांनी महायुतीला मतदान न करण्याची प्रतिज्ञा घेतली.

माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी पदाधिकाऱ्यांना ही शपथ दिली. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आमचे मत निळा झेंडा आणि बाबासाहेबांच्या विचारांना आहे. सन्मानपूर्वक वागणूक न देणाऱ्या महायुतीला मतदान करणार नाही, असा निर्धार यावेळी करण्यात आल्याचे डॉ. धेंडे यांनी सांगितले. पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात हा कार्यक्रम पार पडला.

या वेळी आय्युब शेख, आरपीआयच्या पुणे महापालिकेच्या माजी गटनेत्या फरजाना शेख, मौलाना कारी मोबशीर अहमद, हनुमंत गायकवाड, तानाजी गायकवाड, ईश्वर ओव्हाळ, आदीसह आरपीआयचे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सुमारे २५० पदाधिकाऱ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला. महायुतीचा मित्र पक्ष असलेल्या आरपीआयला राज्यात एकही जागा दिली नाही. याची खदखद सर्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारांच्या अनुयायांमध्ये आहे. राज्यातील आंबेडकरी विचारांच्या अनुयायांमध्ये देखील याबाबत तीव्र भावना आहेत.